सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

सेतू-अभ्यास

Bridge-Course

आठवी -मराठी

शैक्षणिक वर्ष २०२१-२२

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

ज्ञानसेवा तु साफल्यम्



सेतू अभ्यास इयत्ता आठवी (ब्रीज कोर्स)

प्रवर्तक	:	शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन
प्रकाशक	:	राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे
प्रेरणा	:	मा. वंदना कृष्णा, भा.प्र.से., अप्पर मुख्य सचिव , शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय – मुंबई
मार्गदर्शक	:	1) मा. विशाल सोळंकी, भा.प्र.से. , आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे 2) मा. राहूल द्विवेदी, भा.प्र.से., राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
संपादक	:	मा. दिनकर टेमकर, संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे
सहसंपादक	:	डॉ. विलास पाटील, सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे
कार्यकारी संपादक	:	1) डॉ. कमलादेवी आवटे, उपसंचालक, भाषा व समता विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे 2) नीता जाधव, उपविभाग प्रमुख,मराठी विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे
संपादन सहाय्य	:	डॉ. नंदा भोर, अश्विनी नरवणे, विषय सहाय्यक, मराठी विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे
निर्मिती सदस्य	:	हर्षलता व्ही. बुराडे, प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रविनगर, नागपूर (गट समन्वयक) डॉ. सविता आष्टेकर, विषय सहाय्यक जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था रायगड डॉ. लता पाडेकर, पदवीधर शिक्षिका लोकनेते यशवंतराव चव्हाण मनपा विद्यानिकेतन पुणे डॉ. सोनाली हिंगे स. शि. सोमलवार हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय नागपूर सोनाली कातोरे स. शि. श्री ज्ञानेश्वर विद्यालय आळंदी देवाची ता. खेड जिल्हा पुणे

विद्यार्थ्यांशी हितगुज

हा सेतू अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा !

विद्यार्थी मित्रांनो, मागील वर्षात तुम्ही ऑनलाइन व इतर अनेक मार्गांनी तुमचं शिकणं सुरू ठेवलत, तुमचं खूप खूप कौतुक ! आता शैक्षणिक वर्ष सुरू होतय. पुन्हा जोमानं आपल्याला सुरुवात करायचीय. सुरुवातीला काही दिवस आपणाला मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमाची उजळणी करायला हवी, जेणेकरून या वर्षीच्या अभ्यासक्रमासाठी आपली चांगली पूर्वतयारी होईल. ही पूर्वतयारी करणे सोयीचे व्हावे यासाठीच हा 'सेतू अभ्यासक्रम 'तयार करण्यात आला आहे. मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही नेमके काय शिकलात ? या इयत्तेत आपणाला काय नविन शिकायचं आहे हे समजून घेण्यासाठी हा अभ्यासक्रम तुम्हाला मदत करेल.

त्यासाठी तुम्हाला काय करायचयं ? तर हा सेतू अभ्यासक्रम दिवसनिहाय क्रमाने सोडवायचा आहे.यात वेगवेगळया कृतींचा समावेश आहे. या कृती सोडवतांना तुम्हाला मजा येईल.पण लक्षात ठेवा, या कृती तुम्ही दिलेल्या नियोजनाप्रमाणे व स्वत: सोडवायच्या आहेत. सोडवतांना काही अडचण आली तर शिक्षक आणि पालक तुम्हाला मदत करायला आहेतच. या कृती कशा सोडवायच्या ?

आणि हो, हा ४५ दिवसांचा अभ्यास करताना दर पंधरा दिवसांनी तुम्हाला एक छोटीसी चाचणी सोडवायची आहे.चाचणी स्वत: एकट्याने सोडवा. चाचणी सोडवून झाल्यावर ती तुमच्या शिक्षकांकडून तपासून घ्या. चाचणीत न जमलेल्या भागाची पुन्हा तयारी करा. हा अभ्यासक्रम सोडवतांना काही भाग समजला नाही किंवा अवघड वाटला तर काळजी करू नका. तो समजून घेण्यासाठी तुमच्या शिक्षकांची किंवा पालकांची मदत घ्या.

हा सेतू अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी तुम्हाला मन:पूर्वक शुभेच्छा !

शिक्षक पालकांसाठी सूचना

कोविड 19 च्या उद्भवलेल्या परिस्थितीमुळे मागील शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष विद्यार्थी समोर असतांना वर्ग अध्यापन होऊ शकले नाही. नव्या शैक्षणिक वर्षात शाळा कधी सुरू होतील याबाबत अनिश्चितता आहे. मागील शैक्षणिक वर्षात आपण ऑनलाईन माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहचविण्यासाठी विविध प्रयत्न केलेत. मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांनी केलेल्या अध्ययनाची उजळणी व्हावी, तसेच नविन शैक्षणिक वर्षात शिकाव्या लागणाऱ्या अभ्यासक्रमाची पूर्व तयारी हा दुहेरी उद्देश ठेवून हा सेतू अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

सेतू अभ्यासक्रम हा मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमावर आधारित असून मागील इयत्तेचा पाठ्यक्रम व सध्याच्या इयत्तेचा पाठ्यक्रम यांना जोडणारा दुवा आहे.

- सदर अभ्यासक्रम हा इयत्तानिहाय व विषयनिहाय तयार करण्यात आला असून तो मागील इयत्तेच्या पाठ्यपुस्तकाशी संलग्न व त्यातील घटकांवर आधारित आहे.
- सदर अभ्यासक्रमात क्षेत्र, कौशल्य, संकल्पना व अध्ययन निष्पत्ती/क्षमता विधाने यांचा समावेश केला आहे.विद्यार्थ्यांना नेमके काय मार्गदर्शन करायचे आहे यासाठी मदत होईल.
- संकल्पनेप्रमाणे जाणून घेऊ या मध्ये संबंधित संकल्पनेबाबत विद्यार्थ्याचे पूर्वज्ञान जाणून घेण्यासाठी **'जाणून घेऊ या'**त्या संकल्पनेबाबत त्याने अधिक सक्षम व्हावे यासाठी **'सक्षम बनू या'**मिळालेल्या माहितीचे किती आकलन झाले यासाठी **'सराव करू या'** व मिळालेल्या माहितीच्या आधारे विद्यार्थ्याने आधी चिकित्सक विचार करावा,सर्जनशील व्हावे,अर्थात उच्च बोधात्मक क्षमतांच्या विकासासाठी **'कल्पक होऊ या'** या सदरांचा समावेश केला आहे. .
- संकल्पना अधिक चांगल्यारीतीने समजून घेण्यासाठी मदत हवी म्हणून सर्वच कृतीमध्ये दीक्षाअप्प, क़्युआरकोड इ.ची मदत घ्यावी.
- मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थी नेमके काय शिकले हे समजण्यासाठी,त्याची चाचपणी करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना पुढील इयत्तेतील संकल्पना समजून घेण्यासाठी व अध्ययनासाठी हा सेतू अभ्यासक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.
- सेतू अभ्यासक्रम एकूण ४५ दिवसांचा असून त्यात ठराविक कालावधीनंतर घ्यावयाच्या एकूण तीन चाचण्यांचा समावेश आहे.
- शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांकडून सदरचा सेतू अभ्यासक्रम दिवसनिहाय नियोजनाप्रमाणे पूर्ण करून घ्यावा.
- चला सराव करू या हे सदर विद्यार्थी स्वप्रयत्नाने सोडवेल याकडे शिक्षकांनी लक्ष द्यावे,आवश्यक तेथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.

- निश्चित केलेल्या कालावधीनंतर घ्यावयाच्या चाचण्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यात,चाचण्या तपासून विद्यार्थीनिहाय गुणांची नोंद स्वतःकडे ठेवावी.
- चाचणी तपासताना विद्यार्थीनिहाय विश्लेषण करून मागे पडलेल्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त पूरक मदत करावी.
- सदरचा सेतू अभ्यास हा शिक्षकांसाठी असला तरीही शाळा ऑफलाईन सुरू नसल्याकारणाने याचा वापर करून पालक, शिक्षक मित्रयांच्यामदतीने विद्यार्थ्यांनी केलेल्या अध्ययनाची उजळणी व पुढीलइयत्तेत शिकावयाच्या कृतींची किंवा अभ्यासक्रमाची पूर्वतयारी घेऊ शकतील.
- वयानुरुप समकक्ष वर्गातील मुलांसाठी **SCERT** मार्फत तयार केलेल्या विद्यार्थी मित्र व शिक्षक मार्गदर्शिका यांचा संदर्भ म्हणून उपयोग करावा.

सेतू अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणी व वापराकरिता आपणास हार्दिक शुभेच्छा!

सेतू अभ्यास आराखडा

१. उद्दिष्टे

१. कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या मनात अध्ययनाविषयी आत्मविश्वास निर्माण करून शिकण्यासाठी आनंददायी वातावरणाची निर्मिती करणे.

२. विद्यार्थ्यांचे गत शैक्षणिक वर्षातील संबंधित इयत्तेच्या उणिवा भरून काढण्यासाठी त्यांना मदत करणे.

३. विद्यार्थ्यांना मागील इयात्तानुरूप भाषा विषयातील अपेक्षित अध्ययन निष्पत्तीनुसार समजपूर्वक वाचनाची संधी उपलब्ध करून संबंधित क्षमता वृद्धिंगत होण्यास मदत करणे.

४. विद्यार्थ्यांना मागील इयत्तेशी जोडून घेण्यासाठी स्वयंअध्ययनासाठी उपयुक्त अशा आनंददायी व कृतियुक्त आशयाची निर्मिती करणे व अभिव्यक्त (लेखन) होण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे.

५ **विद्यार्थ्यांना अभिव्यक्त (लेखन) होण्याची संधी उपलब्ध करुन देणे.**

६. अपेक्षित कौशल्य/ संकल्पना

१. मौखिक भाषा विकास

२. भाषाभ्यास

३. वाचन

४. लेखन

अनुक्रमणिका

दिवस	पृष्ठ क्रमांक	संकल्पना
1	1 - 3	समजपूर्वक प्रकटवाचन करून अभिव्यक्त होणे.
2	4 - 5	सामाजिक समस्यांवर मत मांडणे
3	6 - 7	एखाद्या विषयावर स्वत:चे विचार,मत,भावना व्यक्त करणे.
4	8 - 9	आरोह अवरोह व विरामचिन्हांसह अर्थपूर्ण वाचन करणे.
5	10 - 11	स्थानिक सामाजिक घटनांविषयी तर्कशुद्ध प्रतिक्रिया देतात
6	12 - 13	संवाद वाचून ऐकून त्यावर व्यक्त होणे
7	14 - 15	प्रसंग चित्र पाहुन त्यावर व्यक्त होणे
8	16 - 17	साहित्य वाचनाबाबतच्या आवडी - निवडी जाणून घेणे
9	18 - 19	लोककथा, कथांचा आस्वाद घेणे त्यात स्वत:च्या शैलीनुसार भर घालने.
10	20 - 21	शेतीविषयक कामे जाणून घेणे
11	22 - 23	ओघतक्ता तयार करणे
12	24 - 27	सामान्य रूप
13	28 - 29	गटात न बसणारा शब्द.
14	30 - 32	अर्थपूर्ण शब्द
15	33	**चाचणी** - 1
16	34 - 36	वाक्प्रचार
17	37 - 39	म्हणी
18	40 - 41	क्रियाविशेषण अव्यय
19	42 - 43	शब्दयोगी अव्यय
20	44 - 45	उभयान्वयी अव्यय
21	46 - 47	केवलप्रयोगी अव्यय
22	48 - 49	वाक्य आणि वाक्यांचे प्रकार भाग 1
23	50 - 51	वाक्य आणि वाक्यांचे प्रकार भाग 2
24	52 - 54	शुद्धलेखनाचे नियम
25	55 - 57	समजपूर्वक वाचन करून मत मांडणे
26	58 - 60	प्रकट व मुकवाचन
27	61 - 62	स्वत:चे विचार मांडणे
28	63 - 64	विविध कलांचा आनंद घेणे
29	65 - 66	सर्जनात्मक लेखन
30	67	**चाचणी** - 2
31	68 - 69	बातमी लेखन
32	70 - 71	समजपूर्वक वाचन व त्यावर मत मांडणे
33	72 - 74	कवितांचा आनंद घेणे

34	75 - 77	कवितांचा आशय समजपूर्वक समजून घेणे.
35	78 - 79	जाहिरात लेखन
36	80 - 81	वर्णनात्मक निबंधलेखन
37	82 - 83	संवादलेखन
38	84 - 85	प्रसंगलेखन
39	86 - 87	कल्पनात्मक निबंधलेखन
40 - 41	88 - 90	पत्रलेखन
42	91 - 92	भेटकार्ड तयार करणे
43	93 - 95	सारांशलेखन
44	96 - 97	बोलीभाषा परिचय
45	98 - 99	**चाचणी** - 3

दिवस - एक

क्षेत्र – मौखिक भाषाविकास

क्षमता/कौशल्य- भाषण-संभाषण , वाचन-लेखन

संकल्पना –समजपूर्वक प्रकटवाचन करून अभिव्यक्त होणे.

अध्ययन निष्पत्ती –आशय वाचून स्वतःच्या शब्दात साम्य, सहमती वा असहमती व्यक्त करणे.

शिक्षकांसाठी सूचना - वाचन करण्यासाठी उतारा किंवा तत्सम साहित्य देण्यापूर्वी शिक्षकांनी;ज्या घटकाचे अध्ययन अनुभव देण्याचे निश्चित केले आहे; त्यासंबंधीचे मुलांचे पूर्वज्ञान पुढीलप्रमाणे काही मौखिक प्रश्न विचारून जाणून घेण्याचा प्रयत्न करावा.

जाणून घेवू या!

तुम्ही पाहिलेल्या; तुमच्या अजूनही लक्षात आहे अशा एका स्वप्नाबद्दल सांगा.

शिक्षकांसाठी सूचना-शिक्षकांनी मुलांना वाचनसाहित्य पुरवावे. त्या वाचनसाहित्याचे समजपूर्वक प्रकटवाचन करून घ्यावे. वाचन घटक व मुलाचे अनुभवविश्व यांची सांगड घालून पुढीलप्रमाणे तोंडी प्रश्न मुलांना विचारावेत.

सक्षम होऊ या!

आपण सर्वजण स्वप्ने पाहत असतो. आपल्याला वाटत असते की; मला कोणीतरी बनायचे आहे. माझ्या आवडीचे असे काहीतरी साध्य करावयाचे आहे. मला खूप मोठे व्हायचे आहे. असा विचार जेव्हा आपण करतो; तेव्हा खरे तर आपण स्वप्नंच पहात असतो. खूप मोठे होणे, आवडीचे असे काहीतरी बनणे, साध्य करणे हे प्रत्यक्षात आणण्यासाठी आपणास काही गोष्टी निश्चित कराव्या लागतात. त्या म्हणजे आपले ध्येय ठरविणे. ते गाठण्यासाठीचे शिस्तबद्ध नियोजन करणे. आणि त्याबरहुकूम नियमित व सातत्याने प्रयत्न करणे. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम म्हणतात, "झोपेत नाही तर जागेपणी पाहिलेली स्वप्नेच खरी होतात." पण यासाठी हवी असते ती जिद्द, चिकाटी, चिवट प्रयत्न, आणि यशाच्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचण्यासाठीचा दुर्दम्य आशावाद!

१. 'जागेपणी पाहिलेली स्वप्नेच खरी होतात.' या विधानाचा तुम्हाला समजलेला अर्थ सांगा.

२. झोपेत पाहिलेली स्वप्ने खरी होतात का? याविषयीचा तुमचा अनुभव किंवा मत सांगा.

३. स्वप्न पूर्ण करणे म्हणजे .....


१. ..... २. .....

३. ..... ४. .....

शिक्षकांसाठी सूचना- मुलाने सहमती,असहमती किंवा वाचलेल्या घटकाशी साम्य दर्शवणारे त्याचे अनुभव सांगावेत यासाठी त्यालागटात, सहाध्यायी किंवा वैयक्तिक स्वरुपात मौखिक कार्य करण्यासाठी प्रवृत्त करावे.

चला सराव करू या!

तुम्हाला कोण व्हावेसे वाटते ? हे पुढील मुद्द्यांच्या आधारे लिहा.



तुमच्या आई-बाबांनी तुमच्याविषयी एखादे स्वप्न पाहिले असेल. तुमच्या भविष्याविषयी काही योजना आखल्या असतील; तर ते पूर्ण करण्यासाठी तूम्ही काय कराल? हे पुढील मुद्द्यांच्या आधारे सांगा.

१. आई-बाबांनी तुमच्याविषयी पाहिलेले स्वप्न/ योजना .....

२. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या क्षमता, कौशल्ये,शिक्षण इत्यादी.

३. त्यासाठी लागणारा कालावधी

४. त्यानंतरचे बदललेल्या तुमच्या जीवनाविषयीच्या तुमच्या कल्पना (सामाजिक प्रतिष्ठा, मानसन्मान, आर्थिक लाभ, कौटुंबिक सौख्य इ.)

कल्पक

शिक्षकांसाठी सूचना- मुलांना आव्हानात्मक कार्याचा आनंद घेता यावा; यासाठी बुद्धीला, विचारांना चालना देणारे प्रश्न येथे विचारावेत.



तुमच्या नात्यातील अगदी जवळच्या व्यक्तीने त्याचे स्वप्न पूर्ण केलेले आहे. त्याची मुलाखत घेण्यासाठी पाच प्रश्न तयार करा.

दिवस - दोन

क्षेत्र- मौखिक भाषाविकास

क्षमता/कौशल्ये - भाषण-संभाषण, वाचन-लेखन

संकल्पना : सामाजिक समस्यांवर मत मांडणे.

अध्ययन निष्पत्ती –परिसरातील सामाजिक समस्यांची नोंद घेतात. त्याबद्धल आपले मत मांडतात.

शिक्षकांसाठी सूचना- शिक्षकांनी विद्यार्थ्यांसमोर एखादी सामाजिक घटना,प्रसंग,विचार ठेवून सध्य:स्थितीबाबत मुलांचे विचार, मते जाणून घेण्यासाठी पुढीलप्रमाणे मौखिक कृती करून घ्याव्यात,प्रश्न विचारावेत.


जाणून घेवू या!

कोरोना संसर्गापासून बचावासाठी तुम्ही कोणकोणती काळजी घेत आहात?

शिक्षकांसाठी सूचना- मुलांना पूरक वाचनसाहित्य पुरवावे. प्रकट वाचन करून घ्यावे. मुलांना आशयाची झालेली समज प्रश्नोत्तरांद्वारे जाणून घ्यावी. स्वतःची मते, स्व-अनुभव सांगण्यासाठी त्यांना संधी उपलब्ध करून द्याव्यात.

सक्षम होऊ या

जीवनात कधीकधी एखादी कठीण परिस्थिती, हतबल करणाऱ्या घटना, नियंत्रणाबाहेरचे प्रसंग निर्माण होतात. अशा परिस्थितीत काय करावे? हे माणसाला काही काळ तरी सुचत नाही. हळूहळू परिस्थितीचा स्वीकार करून तो तिच्याशी तडजोड करण्याचा प्रयत्न करू लागतो. जसे कोविड-१९ जागतिक महामारीमुळे आपणास स्वीकारावा लागलेला लॉकडाऊन. यामुळे जरी आपल्या संचार स्वातंत्र्यावर मर्यादा आल्या तरी त्या आपण स्वीकारलेल्या आहेत. या स्वीकारामागे आपल्या अनेक भूमिका असतात. त्यापैकी दोन महत्वाच्या भूमिका म्हणजे संसर्ग पसरण्यावर नियंत्रण मिळविणे व जीवंत राहणे. 'बचेंगे तो और भी लढेंगे' असे आपण म्हणतो. कारण काही काळ परिस्थितीला शरण जावे लागले तरी; पुन्हा नव्या उमेदीने आपण उभे राहू शकतो असा आशावाद आपल्यामध्ये असतो म्हणूनच!



शिक्षकांसाठी सूचना- मुलांनी दैनंदिन जीवनात घेतलेल्या अनुभवांची मौखिक अभिव्यक्ती करण्याच्या संधी मुलांसाठी निर्माण कराव्यात.

सराव करू या!

लॉकडाऊन परिस्थितीत अभ्यासाचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी असणारे तुझे नियोजन पुढील मुद्द्यांच्या आधारे तयार कर. गटात मित्रांना, घरात आई-बाबांना वाचून दाखव.

१.वाचनासाठी द्यावयाचा वेळ.

२.मुख्य व नवीन संकल्पना समजून घेण्यासाठी द्यावयाचा वेळ

३.केलेल्या अभ्यासाचे दृढीकरण करण्यासाठी द्यावयाचा वेळ.

शिक्षकांसाठी सूचना- मुलांमध्ये सामाजिक बांधिलकी व मानवीय दृष्टीकोन वाढीस लागण्यासाठी पुढीलप्रमाणे कल्पक रचना करून घ्याव्यात.

कल्पक होऊ या!

या कोरोना काळात अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी जसे डॉक्टर, सफाई कामगार, नर्स रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी मोलाचे कार्य करत आहेत.त्यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करणारा whatsappmsg तयार कर. शक्य झाल्यास त्याचे रेकॉर्डिंग करून तुझ्या ओळखीच्या वरीलपैकी एका व्यक्तीला ऐकव.

दिवस - तीन

क्षेत्र- मौखिक भाषाविकास
क्षमता/कौशल्ये – भाषण-संभाषण, वाचन-लेखन
संकल्पना : एखाद्या विषयावर स्वतःचे विचार, मते, भावना व्यक्त करणे.

अध्ययन निष्पत्ती –समजपूर्वक वाचन करून एखाद्या विषयावर स्वतःचे विचार, मते, भावना व्यक्त करतात.

शिक्षकांसाठी सूचना- स्वतःच्या भावना, अनुभव, मते मुलांनी व्यक्त करावीत; यासाठी शिक्षकांनी खालीलप्रमाणे व स्वतःच्या कल्पकतेनुसार मुलांकडून मौखिक भाषाविकासासाठीच्या कृती करून घ्याव्यात.

जाणून घेऊ या!

या लॉकडाऊन परिस्थितीत तुमच्यासाठी त्रासदायक ठरलेला एक अनुभव सांगा.

शिक्षकांसाठी सूचना- मुलांकडून उताऱ्याचे प्रकटवाचन करून घ्यावे. त्यावर आधारित प्रश्न विचारावेत. मुले उताऱ्यातील आशयाशी समांतर अनुभव सांगू शकतील असे प्रश्न विचारावेत. त्याची उत्तरे लिहून घ्यावीत?

सक्षम होऊ या!

दिवसभर बेडवर पडून मी वेगवेगळ्या कल्पना लढवत बसायचो. कल्पनेतले खेळ कंटाळा घालवायला मदत करायचे. आम्हाला रात्री खेळण्यासाठी मी एक खेळ शोधून काढला. इतर मुलामुलींनाही तो शिकवला. मनाविरुद्ध असलेली कुठलीही परिस्थिती एकाने सांगायची. आपल्याला आवडत नसणाऱ्या परिस्थितीतही अनेक चांगल्या गोष्टी लपलेल्या असतात. त्यामुळे तशा परिस्थितीचेही काही फायदे होऊ शकतात. हे फायदे आणि चांगल्या गोष्टी शोधण्याचं काम इतरांनी करायचं. जो जास्तीत जास्त चांगल्या गोष्टी शोधून काढेल, तो या खेळाचा विजेता.

मी शोधून काढलेला हा खेळ सगळ्या मुलामुलींना खूपच आवडला. या खेळामुळे हॉस्पिटलमधला वेळ थोडातरी मजेत जायला लागला. या खेळाचा अजूनही एक फायदा माझ्या लक्षात आला. आवडत नसणाऱ्या परिस्थितीतूनही काही चांगलं निघू शकतं, हे सगळ्यांनाच समजायला लागलं. अनेक मुलांची हॉस्पिटल बद्दलची जी कुरकुर चालायची, तीही हळूहळू बरीच कमी झाली.

सराव करूया!

१. या लॉकडाऊनमध्ये मित्रांच्या सोबत 'मैदानी खेळ' खेळण्यावर मर्यादा आल्या असणार. अशा परिस्थितीत तुम्ही कोणते खेळ खेळलात?

२, कोणते नवीन खेळ निर्माण करण्याचे प्रयत्न केलेत?

३,आलेला कंटाळा घालवण्यासाठी केलेली एक कृती उदाहरणासह सांगा.

शिक्षकांसाठी सूचना- मुलांना पुढीलप्रमाणे कल्पना करून तोंडी /लेखी स्वरुपात अभिव्यक्त होण्यास प्रोत्साहन द्यावे.

कल्पक होऊ या!



कल्पक होऊया!

समजा कोरोना विषाणू तुमच्या स्वप्नात आला आहे. त्याच्याशी केलेला संवाद येथे लिहा.

दिवस -चार

क्षेत्र : मौखिक भाषा विकास

कौशल्य/क्षमता : श्रवण, भाषण-संभाषण, वाचन-लेखन


संकल्पना : आरोह-अवरोह व विरामचिन्हांसह अर्थपूर्ण वाचन करणे.

अध्ययन निष्पत्ती -योग्य आरोह-अवरोह व विरामचिन्हांची दखल घेत समजपूर्वक वाचन करतात.

शिक्षकांसाठी सूचना- विद्यार्थ्यांना प्रसंगानुरूप भावना व्यक्त करता याव्यात यासाठी खालीलप्रकारे संधी तसेच तुमच्या कल्पकतेनुसार भावनाविष्काराचे विविध मार्ग, माध्यमे विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावीत.

जाणून घेऊ या!

पुढे दिलेल्या इमोजींचा(भावमुद्रा) वापर तुम्ही कोणत्या भावनांच्या अभिव्यक्तीसाठी करता/ करू शकाल? याविषयी सांगा.



शिक्षकांसाठी सूचना- मुलांना विरामचिन्हांची ओळख करून द्यावी. खालील वाक्यांचे वाचन करून घ्यावे. आरोह-अवरोह, आवाजातील चढउतार, विरामचिन्हे विचारात घेऊन वाक्यांचे वाचन केल्यास वाक्यांच्या अर्थात होणाऱ्या फरकाचे अवलोकन व निरीक्षण करण्यास सांगावे.

सक्षम होऊ या!

पुढील चिन्हांची नावे सांगा.

१) ? २) ! ३) . ४) , ५) : ६) ; ७) - ८) “.....” ९) ‘.....’

२) पुढे दिलेली वाक्ये कंसात दिलेल्या सुचनेनुसार मोठ्याने म्हणा. व त्यातून बदलणाऱ्या अर्थाचा अनुभव घ्या.

अ)हसू नको. खरं काय ते सांग. (रागाने, मिश्किलपणे,प्रश्नार्थक)

ब) काय झालंय रडायला. (प्रेमाने, रागाने, हताशपणे)

क) या आपलीच वाट पहात होतो. (आदराने, रागाने, हताशपणे)

सराव करूया!



खाली दिलेले एक वाक्य आरशासमोर उभे राहून कंसात दिलेल्या सूचनेनुसार मोठ्याने वाचा व त्यानुसार बदलणाऱ्या भावनांचा आनंद घ्या.

काय, ठिक चाललंय ना ! (१. रागात २. प्रेमाने ३. प्रश्नार्थक ४. आदराने ५. हताशपणे ६. मिश्किलपणे)

१) ? २) ! ३) . ४) , ५) : ६) ; ७) - ८) “.....” ९) ‘.....’

वरील चिन्हे वापरून प्रत्येकी एकेक वाक्य तयार कर.

शिक्षकांसाठी सूचना-शिक्षकांनी भाषिक अभिव्यक्तीमध्ये असणारे भावनांचे महत्त्व मुलांना कळावे म्हणून मुलांकडून पुढीलप्रमाणे मनोरंजनात्मक कृती करून घ्याव्यात.

कल्पक होऊ या!

मोबाईलमध्ये असणाऱ्या कोणत्याही पाच इमोजी (भावमुद्रा) निवडा व त्यास पूरक विरामचिन्हे वापरून भावनादर्शक वाक्ये तयार करून सांगा.

दिवस -पाच

क्षेत्र – मौखिक भाषाविकास

क्षमता/कौशल्य- भाषण-संभाषण , वाचन-लेखन

संकल्पना –- स्थानिक, सामाजिक घटनांविषयी तर्कशुद्ध प्रतिक्रिया देतात.

अध्ययन निष्पत्ती -- स्थानिक, सामाजिक घटनांविषयी तर्कशुद्ध प्रतिक्रिया देतात व दिलेल्या विषयासंदर्भात मौखिक पद्धतीने अभिव्यक्त होतात.

शिक्षकांसाठी सूचना- स्थानिक, सामाजिक घटनांविषयी तर्कशुद्ध प्रतिक्रिया द्याव्यात व दिलेल्या विषयासंदर्भात मुलांनी मौखिक पद्धतीने अभिव्यक्त व्हावे यासाठी विविध प्रकारचे मुलांच्या भावविश्वाशी निगडीत असणारे प्रश्न शिक्षकांनी मुलांना विचारावेत.

जाणून घेऊया!

१. सद्यस्थितीत तुमच्या वाचन-लेखन कौशल्यांमध्ये वाढ झाली आहे की घट? याची काय कारणे असावीत असे तुम्हाला वाटते?

२. हस्ताक्षर कोणकोणत्या कारणामुळे बिघडते? तुम्हाला तुमचे हस्ताक्षर सुधारायचे असेल तर यासाठी तुम्ही कोणकोणते प्रयत्न कराल? ते लिहा.

शिक्षकांसाठी सूचना-मागील वर्षभरात मुले online-offline, पालकांच्या मदतीने शिकत आहेत. त्यांनी त्यांचे अनुभव लिहावेत. यासाठी त्यांना वेगवेगळे प्रश्न विचारावेत, त्यांच्याशी औपचारिक / अनौपचारिक चर्चा करावी. गप्पा माराव्यात.

सक्षम होऊया!

सद्यस्थितीत online शिक्षणाचा पर्याय आपण स्वीकारलेला आहे. Online शिक्षणाचे तुम्हाला आलेले अनुभव पुढील मुद्यांच्या सहाय्याने लिहा.

सुरुवातीला शिकताना आलेल्या दोन अडचणी	Onlineशिकणे शक्य झाले/नाही.दोन कारणे.	शिकताना मिळालेले दोन वेगळे अनुभव

शिक्षकांसाठी सूचना-तुलना, फरक सांगता यावेत असे प्रश्न सरावासाठी विचारून मुलांचा अधिक सराव करून घ्यावा.

सराव करूया!

१. वर्गातील शिकणे व online(आभासी) वर्गातील शिकणे यातील तुला जाणवलेला फरक स्पष्ट कर.





शिक्षकांसाठी सूचना-विद्यार्थ्यांनी त्यांच्या अनुभवांचे लेखन करावे यासाठी त्यांना कल्पनात्मक लेखन करण्यास प्रवृत्त करावे.

कल्पक होऊ

शाळेचे वर्ग रिकामे आहेत. नेहमीच मुलांच्या गजबजाटाने, गोंगाटाने व्यापलेल्या शाळेत आता शुकशुकाट दिसून येत आहे. जर तुमची शाळा तुमच्याशी बोलू लागली तर..... तुम्हाला ती काय-काय सांगेल? ते लिहा.

दिवस -सहा

क्षेत्र – मौखिक भाषाविकास

क्षमता/कौशल्य- भाषण-संभाषण , वाचन-लेखन

संकल्पना –संवाद वाचून /ऐकून त्यावर व्यक्त होणे.

अध्ययन निष्पत्ती – घर व परिसरातील अनौपचारिक विषयावरील संवाद ऐकतात, त्यावर आपले मत मांडतात.

शिक्षकांसाठी सूचना- शिक्षकांनी कंसातील योग्य शब्द वापरून विद्यार्थ्यांकडून पुढील रिकाम्या जागा भरून घ्याव्यात.

जाणून घेऊया!

(कला, आत्मसंवाद, संवाद, एकापेक्षा)

विविध कारणांसाठी आपण एकमेकांशी ..... साधत असतो. संवाद साधने ही एक ..... आहे. संवाद ..... अधिक व्यक्तींमध्ये होत असतो. आपलाच आपल्याशी जो संवाद चालतो त्यास ..... म्हणतात.

शिक्षकांसाठी सूचना- शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून पुढीलप्रमाणे विविध संवादांचे प्रकट वाचन करून घ्यावे. त्यावर आधारित प्रश्न विचारावेत.

सक्षम होऊ या!

करण : रमण, कसा आहेस?मागच्या वर्षी मार्च महिन्यात लॉकडाऊन झाले होते ना!

रमण : होय ना रे!.

करण : रमण, जून महिना सुरु झालाय आता. तब्बल एक वर्षापेक्षा जास्त काळ आपण घरीच आहोत.

रमण : खरं सांगू का? इतके दिवस शाळेपासून लांब राहावे लागेल असे वाटले नव्हते.

करण : हो ना. मला तर मे महिन्या ऐवजी मार्चमध्येच सुट्ट्या लागल्या म्हणून खूप आनंद झाला होता. पण नंतर-नंतर एकदम बोअर झालो बघ.

१. वरील संवाद कोठे सुरु असावा असे तुला वाटते? (रस्त्यात, शाळेत, फोनवर, बाजारात)

२. वरील संवादातील उल्लेखित जून महिना २०२० की २०२१ मधील आहे?

३. तुला काय वाटते, रमण आणि करण जास्तीची सुट्टी मिळूनही का कंटाळले असतील?

४. या संवादात आलेल्या इंग्रजी शब्दांचे मराठीतील प्रतिशब्द लिही.

सराव करूया!

शिक्षकांसाठी सूचना- शिक्षकांनी मुलांसाठी विविध प्रकारचे वाचनसाहित्य उदा. संवाद, उतारे, ललितलेख, गोष्टी वाचण्यासाठी उपलब्ध करून द्याव्यात व त्यावर आधारित वस्तुनिष्ठ, मुक्तोत्तरी, विचारास चालना देणारे प्रश्न विचारून सराव करून घ्यावा.

कल्पक होऊ या!

कोरोना व्हायरस व कोरोना लस यांच्यातील संवाद कल्पना करून लिही.



दिवस - सात

क्षेत्र – मौखिक भाषाविकास

क्षमता/कौशल्य- भाषण-संभाषण , वाचन-लेखन

संकल्पना – प्रसंगचित्र पाहून त्यावर व्यक्त होणे.

अध्ययन निष्पत्ती -कोणतेही चित्र/घटना, प्रसंग पाहून त्याचे स्वतःच्या पद्धतीने तोंडी/लेखी स्वरुपात वर्णन करतात.

शिक्षकांसाठी सूचना- शिक्षकांनी चित्राविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा करावी.चित्राचे वर्णन करण्यास सांगावे. खालीलप्रमाणे एखादा अनुभव त्याने घेतला असल्यास किंवा ऐकला, पहिला असल्यास त्याविषयी अनुभव सांगण्यास सांगावे.

जाणून घेऊया!



सक्षम होऊया!


शिक्षकांसाठी सूचना- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरीलप्रमाणे प्रासंगिक, नैसर्गिक, घटनादर्शक चित्रे दाखवावीत व प्रश्न विचारून विद्यार्थ्यांना त्यांचे अनुभव, मते, विचार व्यक्त करण्याची संधी द्यावी.

सराव करूया!

शिक्षकांसाठी सूचना- विद्यार्थ्यांबरोबर औपचारिक/अनौपचारिक गप्पा मारणे. अनौपचारिक संवाद ऐकून मत व्यक्त करण्यास प्रोत्साहित करणे.

१. काही दिवसांपूर्वी 'त्योक्ते' वादळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचे वर्णन कर.

२. पर्यावरण रक्षण करणे का गरजेचे आहे? पुढील मुद्यांच्या आधारे सकारण स्पष्ट कर.



शिक्षकांसाठी सूचना- विद्यार्थ्यांबरोबर अनौपचारिक गप्पा मारणे. अनौपचारिक संवाद ऐकून मत व्यक्त करण्यास, बुद्धीमंथनाद्वारे विविध पर्याय शोधण्यास संधी द्याव्यात.

कल्पक होऊ या!

पावसाळा या ऋतुची सुरुवात झालेली आहे. समज,अतिवृष्टी होऊन पूर-परिस्थिती निर्माण झाली तर आपत्कालीन व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने तू कोणत्या उपाययोजना सुचवशील?

दिवस -आठ

क्षेत्र : मौखिक भाषा विकास
कौशल्य/क्षमता : श्रवण, भाषण-संभाषण
संकल्पना : साहित्यवाचनाबाबतच्या आवडी-निवडी जाणून घेणे.

अध्ययन निष्पत्ती -मराठी भाषेमधील वेगवेगळ्या प्रकारचे साहित्य वाचून त्याविषयीची आपली आवडनिवड सांगतात.


शिक्षकांसाठी सूचना- विद्यार्थ्यांची आवड जाणून घेण्यासाठी शिक्षकांनी वेगवेगळे पर्याय वापरून मुलांना अभिव्यक्त होण्यास संधी द्याव्यात.

जाणून घेऊया!

- इयत्ता सातवीच्या पाठ्यपुस्तकातील तुला आवडलेला पाठ कोणता?
- त्या पाठातील सर्वात जास्त आवडलेला प्रसंग कोणता?
- आवडलेल्या पाठाचा आशय थोडक्यात सांग.

सक्षम होऊया!

शिक्षकांसाठी सूचना- शिक्षकांनी मुलांच्या आवडीचे विषय व आवडीच्या विषयातील अधिकाधिक माहिती जाणून घेण्यासाठी पुढीलप्रमाणे तसेच स्वतःच्या कल्पकतेप्रमाणे प्रयत्न करावेत. उदा.
इयत्ता सातवीच्या पाठ्यपुस्तकातील तुम्हाला आवडणाऱ्या कवितेसंदर्भात खालील मुद्द्यांच्या आधारे माहिती सांगा.



सराव करूया

पुढे काही लय- तालयुक्त शब्द दिले आहेत. त्यांचा वापर करून कवितेच्या काही ओळी तयार करण्याचा प्रयत्न करा व वाचून दाखवा.

वारा- गारा, गिरकी- फिरकी, हिरवी- पालवी, धारा- झरा, नाचू- गाऊ , चिंब-होवू

शिक्षकांसाठी सूचना- विद्यार्थ्यांना स्व-अभिव्यक्तीसाठी स्वतंत्रपणे काम करण्यास प्रेरित करावे. गरज असेल तिथे मदत करावी.

कल्पक होऊया!

खाली दिलेल्या शब्दांतील वस्तू-व्यक्तींच्या गुणांची साम्यदर्शक तुलना करा व त्यावर आधारित एक वाक्य बनवा. यासारखे आणखी शब्द शोधा व वाक्ये बनवा.

शब्द	साम्यदर्शक तुलना	वाक्य
आई व झाड	सावली, आधार	झाडांची मुळे झाडाला आधार देतात तसेच माझी आई आमच्या कुटुंबाला आधार देते.
आई व समुद्र		
आई व आकाश		
आई व जमीन		

दिवस -नऊ

क्षेत्र – मौखिक भाषाविकास

क्षमता/कौशल्य- भाषण-संभाषण , वाचन-लेखन

संकल्पना –लोककथा, कथांचा आस्वाद घेणे.त्यात स्वतःच्या शैलीनुसार भर घालणे.

अध्ययन निष्पत्ती – परिसरातील लोककथा , कथा, संवाद ऐकून आनंद घेतात. आपले मत मांडतात.

शिक्षकांसाठी सूचना- शिक्षकांनी मुलांना प्रश्न विचारून त्यांना माहीत असणाऱ्या गोष्टींविषयी चर्चा करण्यास प्रवृत्त करावे. गोष्ट सांगण्यास प्रोत्साहित करावे.

जाणून घेऊया!

तुम्ही लहानपणापासून ऐकत आलेल्या गोष्टी व स्वतः वाचलेल्या गोष्टी यांची यादी करा. गटात व मित्रांना ही यादी वाचून दाखवा. गटात तुम्हा सगळ्यांना माहीत आहेत अशा गोष्टींची एक नवीन यादी तयार करा.


एक होता कावळा आणि एक होती चिमणी. चिमणीचे घर होते मेणाचे आणि कावळ्याचे घर होते शेणाचे. ही गोष्ट तुम्ही ऐकली असेल. या गोष्टीचा शेवटही तुम्हाला माहीत असेल. समजा आपण या गोष्टीचा शेवटच बदलला तर.....

जसे की: चिमणीने मुसळधार पावसात कावळेदादाला आपल्या घरात आश्रय दिला. पावसाळा संपेपर्यंत कावळेदादा चिऊताईच्या घरात राहिला. पावसाळा संपला कावळेदादा भुर्रर उडून गेला. दिवस असेच निघून गेले आणि आता आला उन्हाळा. सूर्य तळपू लागला. सारी सृष्टी तापू लागली. बिचाऱ्या चिऊताईचे मेणाचे घरटे वितळू लागले. चिऊताईला फार दु:ख झाले. ती रडू लागली. इतक्यात तेथे कावळेदादा आला आणि म्हणाला, ▯ चिऊताई, अगं काळजी कशाला करतेस? माझं शेणाचं नवीन घरटं बनवलंय की मी पुन्हा. येशील का माझ्या घरट्यात राहायला?▯

शिक्षकांसाठी सूचना- शिक्षकांनी अशाप्रकारे मुलांना माहित असणाऱ्या गोष्टींची सुरुवात, शेवट, गोष्टीचा मध्य बदलून मुलांना नवीन गोष्टी बनविण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, मदत करावी, मार्गदर्शन करावे.

सराव करूया!

तुम्ही ऐकलेली किंवा वाचलेली एक गोष्ट आठवा. त्या गोष्टीत तुम्हाला आढळलेल्या बाबी पुढे दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे लिहा.



शिक्षकांसाठी सूचना - शिक्षकांनी मुलांना माहीत असणाऱ्या गोष्टींच्या संबंधाने अशाप्रकारच्या कृती मुलांकडून करून घ्याव्यात. यामुळे गोष्टींतील सूक्ष्म बारकावे मुलांना समाजातील व त्याचा उपयोग स्वतंत्र गोष्टी लिहिताना मुलांना होऊ शकेल.

कल्पक होऊया!

१. पुढे दिलेले तीन शब्द वापरून गोष्ट तयार कर.

हत्ती, कासव, नदी

२. तू वाचलेले, तुला खूप आवडलेले गोष्टीचे पुस्तक तुझ्या मित्र/मैत्रिणीनेही वाचावे म्हणून त्या पुस्तकाविषयी तू त्यांना काय-काय सांगशील?

दिवस -दहा

क्षेत्र – मौखिक भाषाविकास

क्षमता/कौशल्य- भाषण-संभाषण , वाचन-लेखन

संकल्पना –शेतीविषयक कामे जाणून घेणे.

अध्ययन निष्पत्ती -विविध कला (कृषिकला)यासंबंधी जिज्ञासा व्यक्त करतात. त्या समजून घेण्याचा प्रयत्न करतात.

शिक्षकांसाठी सूचना- **एखाद्या गोष्टीच्या साध्यतेसाठी करावयास लागणाऱ्या पूर्वतयारीचे महत्त्व विविध प्रश्न विचारून विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून देणे.**

जाणून घेऊया !

१. आपल्याला जर प्रवास करावयाचा असेल तर आपण कोणकोणती तयारी करतो?


२.शालेय वयात तुम्ही एखाद्या सहलीला गेला असाल? किंवा क्षेत्रभेट केली असेल. किंवा तुमच्या पालकांसोबत कोठे फिरायला गेला असाल. त्यासाठी तुम्ही काय-काय पूर्वतयारी केली होती? ते आठवून लिहा.

सक्षम होऊया!

असा होतो भाकरीचा प्रवास!

कणसातून धान्य वेगळे करणे

मातीचे थर खालीवर करण्यासाठी करावयाचीप्रक्रिया म्हणजे नांगरणी



विशिष्ट कालावधीनंतर तयार झालेले पीक कापणे

नांगरणी झालेल्या जमिनीवरची ढेकळे फोडून तिला सपाट करणे

जमिनीत बी पेरणे

या मुख्य शेतीच्या कामांशिवाय शेतीच्या मशागतीपासून धान्य घरात येईपर्यंत शेतकऱ्याला इतर अनेक कामे करावी लागतात.

१. शेतकऱ्याच्या घरात धान्य आल्यानंतर आपल्या ताटात भाकरी येईपर्यंतचा पुढचा प्रवास तुमच्या शब्दांत लिहा.

२. पिठाव्यतिरिक्त भाकरी बनविण्यासाठी अजून कशाकशाची गरज असते?

शिक्षकांसाठी सूचना- शिक्षकांनी विविध उदाहरणांच्या मदतीने आपल्याला सहज प्राप्त होणाऱ्या वस्तू, पदार्थ अथवा धान्य निर्मितीमागे किती जणांचे योगदान असते. याविषयी विद्यार्थ्यांना अवगत करावे. त्यांच्याशी चर्चा करावी.

सराव करूया!

१.आपण सुती कपडे वापरतो. कापड तयार होईपर्यंतच्या प्रवासाची माहिती इंटरनेट, पुस्तके,इतर संदर्भ साहित्य यांच्या सहाय्याने मिळवा व स्वतःच्या शब्दात लिहा.

२. साखरेचा प्रवासही इंटरनेट, माहितीपुस्तकांतील माहिती वाचून समजून घे. व स्वतःच्या शब्दात लिही.

कल्पक होऊया!



घरात एक वेळच्या स्वयंपाकासाठी कोणकोणते पदार्थ, वस्तू, साधने वापरली जातात. त्याचे निरीक्षण कर व यादी बनव.

दिवस -अकरा

क्षेत्र – मौखिक भाषाविकास

क्षमता/कौशल्य- भाषण-संभाषण , वाचन-लेखन

संकल्पना –ओघतक्ता तयार करणे.

अध्ययन निष्पत्ती - विविध विषय आणि उद्देशासाठी लिहितात.

शिक्षकांसाठी सूचना- शिक्षकांनी एखादी घटना,प्रसंग, कृती यांचा योग्य क्रम लावताना कोणकोणत्या बाबी विचारात घेणे गरजेचे आहे याविषयी मुलांशी चर्चा करावी.

जाणून घेऊया!

१. सकाळी उठल्यापासून शाळेत येईपर्यंतचा तुझा घटनाक्रम सांग.

२. पुढे दिलेल्या ससा आणि कासवाच्या गोष्टीतील घटनांचा योग्य क्रम लाव.

कासवाचे शर्यत जिंकणे–बरेच अंतर पुढे आल्यावर भरपूर गवत खाऊन सशाचे झाडाखाली झोपी जाणे - ससा व कासवाने शर्यत लावायचे ठरविणे– शर्यत सुरु होणे – कासवाने झोपलेल्या सशाला पाहणे व हळूहळू पुढे निघून जाणे

सक्षम होऊया!

शिक्षकांसाठी सूचना- मागील वर्षी शाळेत साजऱ्या केलेल्या प्रजासत्ताकदिन कार्यक्रमातील घटनांचा ओघतक्ता उदाहरणादाखल समजून द्या. (टिप- हा केवळ नमुना ओघतक्ता आहे. प्रत्येक शाळेत याप्रकारेच कार्यक्रम होत असतील असे नाही. आपल्या स्थानिक पातळीवरील अनुभवांनुसार ओघतक्ता बदलू शकतो.)



सराव करूया!

शिक्षकांसाठी सूचना- शिक्षकांनी अशाप्रकारे विद्यार्थ्यांना माहीत असलेल्या गोष्टी, पाठातील घटना, प्रसंग तसेच त्यांना कराव्या लागणाऱ्या विविध कृतींचा योग्य घटनाक्रम विद्यार्थ्यांकडून लावून घ्यावा.

कल्पक होऊया!

तुम्ही शाळेचे क्रीडामंत्री आहात. तुम्हाला शाळेच्या होणाऱ्या क्रीडास्पर्धांचे नियोजन करावयाचे आहे. क्रीडास्पर्धा नियोजन कामांचा ओघ तक्ता तयार करा.

- तुमच्या शाळेत तुम्ही साजरा करत असलेल्या कोणत्याही एका कार्यक्रमाचा कार्यक्रमाचा ओघतक्ता तयार करा.

दिवस -बारा

क्षेत्र – - भाषाभ्यास / व्याकरण

क्षमता/कौशल्य- वाचन- लेखन

संकल्पना – सामान्यरूप

अध्ययननिष्पत्ती:-विद्यार्थी 'सामान्यरूप' या घटकाची माहिती घेतातआणि त्याचा लेखनात योग्य वापर करतात.

जाणून घेऊया!

साहित्य - शब्दपट्टी

शिक्षकांनी विविध शब्दपट्टया वापरून तो शब्द वाक्यात येईल अशी वाक्ये विद्यार्थ्यांना बनवायला सांगावीत. तत्पूर्वी नमुन्यादाखल स्वतः १- २ वाक्ये तोंडी सांगून सराव घ्यावा.

उदा. **चंद्र** - पृथ्वीला एकच उपग्रह आहे आणि तो म्हणजे **चंद्र** होय.

नील आर्मस्ट्रॉंग हा **चंद्रावर** पाऊल ठेवणारा पहिला मानव आहे.

पान | पाणी | पाऊस | पक्षी | पोपट

सक्षम बनूया

साहित्य - वाक्यपट्टी

शिक्षकांनी काही वाक्यपट्टया बनवाव्यात. त्या प्रत्येकाकडून वाचून घ्याव्यात. वाक्यात आलेली नामे फळ्यावर एकाखाली एक लिहावीत. शेजारील / खालील / फळ्यावरील रकान्यात कोणते प्रत्यय लागले आहेत ते लिहावेत. आणखी एका रकान्यात शब्दाला प्रत्यय लावताना जो बदल होतो तो लिहावा.

आम्ही काल पावसात भिजलो.

वाघाने जोरात पंजा मारला.

तो आंब्यावर सरसर चढला.

मला बाईंनी गोष्ट सांगितली.

अनु.	नाम	प्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय	प्रत्यय / शब्दयोगी अव्यय लावताना शब्दात झालेला बदल
१	पाऊस	त	पावसा
२	वाघ पंजा	ने -	वाघा -
३	आंबा	वर	आंब्या
४	बाई गोष्ट	नी -	बाईं -

आता शिक्षकांनी वरील तक्त्यावरून सामान्यरूप म्हणजे काय सरळरूप म्हणजे काय या व्याख्या विद्यार्थ्यांच्या मदतीने तयार कराव्यात आणि शेवटी योग्य शब्दातील व्याख्या फलकावर लिहावी.

शब्दाला प्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय लागण्यापूर्वी होणाऱ्या बदलाला **सामान्यरूप** असे म्हणतात. तसेच शब्दाच्या मूळ रूपाला **सरळरूप** असे म्हणतात. जसे 'पाऊस' हे सरळ रूप तर 'पावसा' हे सामान्य रूप होय.

टीप : १. काही एकवचनी शब्दांचे सामान्यरूप होताना बदल होत नाही. उदा. वही, खिडकी, पेरू, साधू....

२. अनेकवचनी शब्दाचे सामान्यरूप करताना तसेच आदरार्थी नावापुढे प्रत्यय लावताना शेवटच्या अक्षरावर अनुस्वार द्यावा लागतो.

उदा. झाडां, पक्ष्यां, खिडक्यां, मावशीं, सरां, बाईं.....

सराव करूया!

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सूचना द्याव्यात की,

- **पुढील वाक्ये वाचून त्यातील सरळरूप, सामान्यरूप, प्रत्यय ओळखा आणि तक्त्यात लिहा.**

अनु.	वाक्ये	सरळरूप	सामान्यरूप	प्रत्यय
१.	माधव गावाला गेला.	गाव	गावा	ला
२.	तो व्हरांड्यात बसतो.			
३.	पेन्सिल वहीत ठेव.			
४.	खिडकीत कुंडी आहे.			
५.	पक्ष्यांनी दाणे टिपले.			

- खालील वाक्य पूर्ण होण्यासाठी कंसात दिलेल्या शब्दाचे योग्य सामान्यरूप लिहा.

  १. त्याच्या (डोके) ..... वर टोपी आहे.

  २. मधुरिमाने (पक्षी) ..... साठी भांड्यात पाणी ठेवले.

  ३. (झाडे)..... ची पाने वाऱ्याने हलत होती.

  ४. आज (वासरू) ..... ने चारा खाल्लाच नाही.

  ५. त्याने चहा (बशी) .....त ओतला.

- खाली पुस्तक या शब्दाला विविध प्रत्यय लावून एक परिच्छेदलिहिला आहे, तो वाचा.

मी पुस्तकाचे पहिले पान पाहिले आणि पुढे वाचू लागलो. तेवढ्यात गौरव आला आणि त्याने माझ्या पुस्तकात मोरपीस ठेवले. खरंच या पुस्तकाने माझ्या मनातील अनेक आठवणींना उजाळा मिळाला. आता मी सर्वच पुस्तकांना खूपखूप जपणार बरं का !

- **त्याप्रमाणे तुम्हीसुद्धा पुढील शब्दांसाठी प्रत्येकी एकेक परिच्छेद लिहा.**

रस्ता शाळा बाग



कल्पक होऊ या!

शब्दखेळ - खालील शब्द पेटीमध्ये काही शब्द आहेत. त्यापैकी सामान्यरूप होणारे आणि न होणारे शब्द निवडा आणि दोन स्वतंत्र पेट्यांमध्ये ठेवा. जो लवकर ठेवणार तो विजयी !

रवी, गोवा, गाव, भाऊ, शेतकरी,
शीला, शब्द, सूर्य, बंडू, रात्र,
मिरची,बाटली, कप, झाडू ....

दिवस -तेरा

क्षेत्र – - भाषाभ्यास / व्याकरण

क्षमता/कौशल्य- वाचन- लेखन

संकल्पना – - गटात न बसणारा शब्द

अध्ययननिष्पत्ती :- विद्यार्थी 'गटात न बसणारा शब्द' या घटकाची माहिती घेतात आणि त्याचा लेखनात योग्य वापर करतात.

जाणून घेऊया!

साहित्य - वाक्यपट्टी

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना समानार्थी शब्दांच्या जोड्या सांगायला लावाव्यात. शब्दपट्टयांच्या सहाय्याने खेळ घ्यावेत. एका शब्दाला अनेक शब्द विचारावेत. उदा. सूर्य - मित्र, रवी, सविता, भानू, खग, दिनकर, प्रभाकर, अर्क, पुष, मरीच, हिरण्यगर्भ इ.



सक्षम बनूया !

साहित्य -शब्दपट्टया

शिक्षकांनी विविध शब्दपपट्टया वापरून विद्यार्थ्यांना शब्दओळख करवून द्यावी. शब्दांचे अर्थ सांगावेत. जाती सांगाव्यात. मग वेगळा शब्द का आणि कसा हे समजावून द्यावे.

प्रभात, रात्र, निशा, यामिनी

श्रीमंत, धनवान, गरीब, लखपती

गवसणे, मिळणे, सापडणे, हरवणे

सीमा, मी, आम्ही, आपण

सराव करू या!

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सूचना द्याव्यात की,

पुढील वाक्यात रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून वाक्ये पूर्ण करा.

१. सकाळी सकाळी ..... (सूर्यकिरणे /चंद्रकिरणे) अंगावर पडल्याने खूप ताजेतवाने वाटत होते.

२. गावाहून आलेल्या आजीने खूप खूप खाऊ आणलेला पाहून नंदाला .... (आनंद झाला / दुःख झाले)

३. सिमरनची आई वारल्याने ती ..... (पोरकी / आबाळ) झाली होती.

४. अचानक वडिलांची नोकरी गेल्याने चार घरची कामे करून ..... (आई / काका) घरखर्च कसाबसा भागवत होती.

कल्पक होऊ या!

पुढील समानार्थी शब्दांचे असे तोरण / माळ / चक्र बनवा.

रस्ता, पथ, वाट, मार्ग, पंथ.....

धरा, पृथ्वी, भूमी, धरणी, जमीन क्षमा....

शब्दांची बाग बनवा आणि गटात न बसणारे शब्दफुल वेगळ्या रंगाने रंगवा.



दिवस -चौदा

क्षेत्र – - भाषाभ्यास / व्याकरण

क्षमता/कौशल्य- वाचन- लेखन

संकल्पना – अर्थपूर्णशब्द

अध्ययन निष्पत्ती : - विद्यार्थी 'अर्थपूर्णशब्द' या घटकाची माहिती घेतात आणि त्याचा लेखनात योग्य वापर करतात.

जाणून घेऊया!

साहित्य - वाक्यपट्टी

शिक्षकांनी शब्दपट्टयांवर / फळ्यावर पुढील शब्द लिहावेत. ते विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावेत.


सुमन विमल गंगापूर गैरहजर असहमत प्रामाणिकपणा बेईमान परग्रह


त्यानंतर प्रत्येक शब्दात कसे प्रत्यय किंवा उपसर्ग लागलेले आहेत ते सांगावे. जसे


सु + मन, वि + मल, गंगा + पूर, गैर + हजर

सक्षम बनूया

खालील आकृत्यांमधून शब्द जोडून नवीन **अर्थपूर्ण** शब्द तयार होतात. ते वहीत लिहा. शिक्षकांनी प्रत्येक शब्दाचा अर्थ समजून सांगावा.









सराव करू या!

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सूचना द्याव्यात की,

- रिकाम्या जागी एक शब्द लिहून त्याला उपसर्ग / प्रत्यय जोडून तयार होणारे अर्थपूर्ण शब्द लिहा.






उत्तरे: **1.** (बेईमान बेकार बेधडक बेढब बेअक्कल बेदम.....)

2. (समानता मानवता एकात्मता एकरूपता सरूपता परिणामकारकता.....)

कल्पक होऊ या!

खालील शब्दपेटीमध्ये काही शब्द आहेत. त्यापैकी एकाच शब्दात दोन शब्द लपलेले आहेत. परंतु त्यांपासून एक नवीन अर्थपूर्ण शब्द बनला आहे. अशा शब्दांचे अर्थ आपापल्या शिक्षकांकडून, आईबाबांकडून, गुगलमधून किंवा शब्दकोशातून समजून घ्या. अशा अर्थपूर्ण शब्दांचा स्वतःचा शब्दकोश बनवा. त्यामध्ये अनेकानेक नवनवीन शब्दांची सतत भर घालत रहा. शुभेच्छा!



- शेवटी 'कर' हा शब्द येणाऱ्या आडनावांचा संग्रह करा.

दिवस –पंधरा

चाचणी क्रमांक - 1

विद्यार्थ्याचे नाव ----------

प्रश्न 1- खाली दिलेल्या अशुद्ध शब्दाचा शुद्ध शब्द पर्यायात शोध व लिही. (गुण - 01)

1) नमसकार - ----------

अ) नमश्कार ब) नमस्कार क) नामक्सार ड) नमष्कार

प्रश्न 2- पुढील वाक्यात कोणते विरामचिन्हे वापरशील? (गुण - 01)

1) खरं सांगशील का आता

अ) ; ब) ! क) ? ड) .

प्रश्न 3- आपलाच आपल्याशी जो संवाद चालतो त्यास ---------- म्हणतात. (गुण - 01)

अ) संवाद ब) आत्मसंवाद क) वाद ड) कलाविष्कार

प्रश्न 4- पुढील इंग्रजी शब्दांचे मराठीतील प्रतिशब्द लिही. (गुण - 02)

1) ईमोजी - ----------

2) आंतरजाल - ----------

प्रश्न 5- इयत्ता सातवी मराठीच्या पाठ्यपुस्तकातील तुला आवडलेल्या (गुण - 02)

1) एका पाठाचे नाव - ----------

2) एका कवितेचे नाव - ----------

प्रश्न 6- पुढील शब्दांचे सामान्यरुप लिही. (गुण - 02)

1) गावाला - ----------

2) पावसात - ----------

प्रश्न 7- शब्दाच्या शेवटी 'कर' हा प्रत्यय लावून दोन शब्द तयार करुन लिही. (गुण - 02)

1) ----------

2) ----------

प्रश्न 8- पुढील शब्दांचा वाक्यात उपयोग कर. (गुण - 01)

1) आश्चर्य - ----------

पाठ्यपुस्तकातील तुला आवडलेल्या पाठातील उतारा वाच व त्याचा तुला समजलेला अर्थ 2 शिक्षकांना / मित्रांना सांग.

दिवस -सोळा

क्षेत्र – - भाषाभ्यास / व्याकरण

क्षमता/कौशल्य- वाचन- लेखन

संकल्पना-वाक्प्रचार

अध्ययन निष्पत्ती :- विद्यार्थी 'वाक्प्रचार' या घटकाची माहिती घेतात आणि त्याचा लेखनात योग्य वापर आणि संग्रह करतात.

जाणून घेऊया!

साहित्य - वाक्यपट्टी

शिक्षकांनी शब्दपट्ट्यांवर/फळ्यावर पुढील वाक्प्रचारासहित वाक्ये लिहावीत.ती विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावीत. विद्यार्थ्यांना वाक्प्रचार अधोरेखित करायला सांगावेत. शिक्षकांनी त्यांचे अर्थ विचारावेत / सांगावेत.

बोलता बोलता तिचा कंठ दाटून आला.

रामराव सतत टोमणे मारत असतात.

माझी तर मातीचं कुंठित झाली.

मीनाने स्पर्धेमध्ये बाजी मारली.

सक्षम बनूया !

वाक्प्रचार आणि म्हणी या भाषेचे सौंदर्य वाढवीत असतात. आता हेच पहा ना - आनंद होणे यापेक्षा 'गगन ठेंगणे होणे', कामावरून काढून टाकणे यापेक्षा 'अर्धचंद्र मिळणे', 'डच्चू मिळणे', 'नारळ मिळणे'; साहित्य संमेलनाचे 'सूप वाजणे' म्हणजे समारोप होणे असे वाचता वाचता आपल्या चित्तवृत्ती फुलून जातात. वाक्प्रचारांचे हे प्रयोजन म्हणजे जणू भाषेतील सुसंकृत अलंकारच होत.

शिक्षकांनी खालील वाक्प्रचारांचा अर्थ दिलेल्या चौकटीतून शोधण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत करावी.

- खो देणे
- पाश सोडणे
- हेका धरणे
- भावनांचे मोहळ चेतवणे

हट्ट करणे,नकार देणे,

भावना जागृत करणे,

बंधनातून मुक्त करणे

- खाली दिलेल्या आकृतीमध्ये शरीराच्या अवयवांवर आधारित विविध वाक्प्रचार प्रचलित आहेत. ते वहीत लिहा. शिक्षकांनी प्रत्येक वाक्प्रचाराचा अर्थ समजून सांगावा.



- डोळे मिचकावणे
- डोळा मारणे
- डोळे पांढरे होणे
- डोळे निवणे
- डोळे मिटणे

सराव करू या!


शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सूचना द्याव्यात की,

- **खालील वाक्प्रचार व अर्थ यांच्या योग्य जोड्या लावा.**

'अ' गट	उत्तरे	'ब' गट
१. नजर रोखणे	**.....**	**अ) वास्तवाचे भान असणे**
२. पाय जमिनीवर असणे	**.....**	**आ) प्रिय गोष्ट दुसऱ्याला देणे**
३. आकाश चार बोटे उरणे	**.....**	**इ) निर्भयपणे पाहणे**
४. काळीज काढून देणे	**.....**	**ई) खूप आनंद होणे**

कल्पक होऊ या!

आपल्या शरीराच्या विविध अवयवांवर आधारित वाक्प्रचारांचा संग्रह करा. त्यामध्ये अनेकानेक नवनवीन वाक्प्रचारांची सतत भर घालत रहा. शुभेच्छा!



कान टवकारणे, ...,


...., ...,

....



हातावर तुरी देणे, ...

....., ..., ...,



याप्रमाणे अधिकाधिक वाक्प्रचारांचा संग्रह करा. ते अकारविल्हे लावा. बोलताना त्यांचा वापर करा. आपली भाषा समृद्ध करा.

दिवस -सतरा

क्षेत्र – - भाषाभ्यास / व्याकरण

क्षमता/कौशल्य- वाचन- लेखन

संकल्पना-म्हणी

अध्ययन निष्पत्ती :- विद्यार्थी 'म्हणी' या घटकाची माहिती घेतात आणि त्याचा लेखनात योग्य वापर आणि संग्रह करतात.

जाणून घेऊया!

कवी बाळकृष्ण बाचल यांची खाली दिलेली कविता विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावी आणि त्यामध्ये आलेल्या म्हणी वहीत लिहायला सांगाव्यात. तसेच त्यावर आधारित काही प्रश्नही विचारावेत.


कर नाही त्याला डर कशाला?
झाकली मूठ सव्वा लाखाची
अंथरून पाहून पाय पसरावे
मनीं वसे ते स्वप्नी दिसे
हातच्या कंकणाला आरसा कशाला
गोगलगाय आणि पोटात पाय
खायला काळ आणि भुईला भार
साखरेचे खाणार त्याला देव देणार
मोठा अश्या थोडक्यात सांगणार

पुढच्यास ठेच मागचा शहाणा झाला.
मेल्याशिवाय खोड जात नाही जित्याची.
हातचे सोडून पळत्या पाठी का लागावे?
नावडतीचे मीठ आणि असे.
दोघांचे भांडण लाभ तिसऱ्याला
गाढवाला गुळाची चव काय?
प्रयत्नांतीच परमेश्वर भेटणार.
टाकीचे घाव सोसून देवपण येणार.
'म्हण' भाषेला सौंदर्य प्राप्त करणार!

कवी - बाळकृष्ण बाचल

सक्षम बनूया !

शिक्षकांनी खालील म्हणींचा अर्थ दिलेल्या कंसातून शोधण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत करावी.



(अ) खालील कंसात काही म्हणी दिलेल्या आहेत. दिलेल्या वाक्यांशी संबंधित म्हण ओळखा व लिहा.

(अति तिथे माती, आगीतून उठून फुपाट्यात पडणे, पळसाला पाने तीनच, नावडतीचे मीठ अळणी, थेंबेथेंबे तळे साचे, कामापुरता मामा, गर्वाचे घर खाली)

(अ) फुशारकी मारणाऱ्याचा पराजय होतो.

(आ) एखाद्याकडून काम करून घेताना गोड बोलायचे आणि काम झाले, की त्याला सोडून द्यायचे.

(इ) सर्वत्र परिस्थिती समान असणे.

(ई) थोडे थोडे जमवून मोठा संचय करणे.

(उ) एका संकटातून बचावणे व दुसऱ्या संकटात सापडणे.

(ऊ) कुठल्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईट असतो.

(ए) न आवडणाऱ्या माणसाने कितीही चांगली गोष्ट केली, तरी ती पसंत पडत नाही.

CS Scanned with CamScanner

६७

- खाली दिलेल्या आकृतीमध्ये शरीराच्या अवयवांवर आधारित विविध म्हणी प्रचलित आहेत. त्या वहीत लिहा. शिक्षकांनी प्रत्येक म्हणीचा अर्थ समजून सांगावा.



नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्न.

नाकापेक्षा मोती जड.

नाक नाही नथीला, भोक पाडा भितीला.

सराव करू या!

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सूचना द्याव्यात की,

- **खाली दिलेल्या चौकटीत काही म्हणी लपल्या आहेत त्या ओळखा.**

अ	णा	श	त्या
का	ति	चा	ल
हा	मा	बै	रि

.....

ए	भा	ना	ध
रा	क	ड	ध्या
भ	चिं	र	

.....

ऐ	ज	चे	क
ना	का	वे	ना
म	रा	वे	चे

.....

- याप्रमाणे विद्यार्थ्यांना अधिकाधिक शब्दकोडी तयार करायला सांगावीत.

कल्पक होऊ या!

- आपण वेगवेगळ्या आणि अधिकाधिक म्हणींचा संग्रह करा. त्या आकारविल्ह्यांनुसार लावा. शक्य झाल्यास बोलताना या म्हणींचा जरूर वापर करा.

दिवस -अठरा

क्षेत्र – - भाषाभ्यास / व्याकरण


क्षमता/कौशल्य- वाचन- लेखन

संकल्पना-क्रियाविशेषणअव्यय

अध्ययन निष्पत्ती :- विद्यार्थी 'क्रियाविशेषण अव्यय' या घटकाची माहिती घेतात आणि त्याचा लेखनात योग्य वापर करतात.

जाणून घेऊया!

शिक्षकांनी **नाम, सर्वनाम, विशेषण आणि क्रियापद याबाबत विद्यार्थ्यांशी विविध उदाहरणाद्वारे चर्चा करावी. त्यानंतर** खालील परिच्छेद विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावा.



• खालील परिच्छेद वाचा.

रवी वारंवार आजारी पडतो. त्याचे घर शाळेच्या पलीकडे आहे. मी अनेकदा त्याच्या घरी जातो. आजही गेलो होतो. मला पाहताच तो झटकन उठला. मी त्याला म्हणालो, ''तू हल्ली सारखा आजारी पडतो आहेस. मी काल तुझी खूप वाट पाहिली. मला तुझ्याशिवाय अजिबात करमत नाही. मी तुला नेहमी सांगतो, की दररोज व्यायाम कर, तुझ्या शरीराची ताकद आपोआप वाढेल.''

वरील परिच्छेदातील अधोरेखित केलेले शब्द क्रियाविशेषण अव्यये आहेत. **क्रियाविशेषण अव्यये** वाक्यातील क्रियापदाबद्दल अधिक माहिती देतात.

लक्षात ठेवा : **विशेषणे** नाम व सर्वनामांबद्दल अधिक माहिती देतात, तर **क्रियाविशेषण अव्यये** क्रियापदाबद्दल अधिक माहिती देतात.

शिक्षक आणि विद्यार्थी यांनी विविध उदाहरणांद्वारे **'क्रियाविशेषण अव्यय' म्हणजे काय याची व्याख्या तयार करून फलकावर लिहावी.**

वाक्यातील क्रियापदाबद्दल किंवा क्रियाविशेषणाबद्दल अधिक माहिती देणाऱ्या शब्दाला 'क्रियाविशेषण' म्हणतात.

सक्षम बनूया !

शिक्षकांनी चित्र आणि उदाहरण यांच्या सहाय्याने क्रियाविशेषण अव्ययाचे प्रकार समजावून द्यावेत.



सराव करू या!

वरीलप्रमाणे विविध उदाहरणे, उपक्रम यांद्वारे शिक्षकांनी अधिकाधिक उदाहरणांचा सराव करून घ्यावा.

कल्पक होऊ या!

खालील चौकोनातील अक्षरांमध्ये काही क्रियाविशेषण अव्यये लपलेली आहेत. उभ्या, आडव्या व तिरप्या पद्धतीने अक्षरे घेऊन क्रियाविशेषण अव्यये तयार करा व दिलेल्या जागेत लिहा.

ह	ळू	थो	डे	आ	रो
आ	ज	डा	मो	ज	के
ज	रा	सा	व	का	श
त	सा	जि	र	ल	ही
अ	ने	क	दा	चि	त
ति	क	डे	खा	ली	र

....

- क्रियाविशेषण अव्ययाच्या प्रकारांचा एक तक्ता करून वर्गात लावा.

दिवस – एकोणवीस

क्षेत्र – - भाषाभ्यास / व्याकरण

क्षमता/कौशल्य- वाचन- लेखन

संकल्पना-शब्दयोगीअव्यय

अध्ययन निष्पत्ती :- विद्यार्थी 'शब्दयोगी अव्यय' या घटकाची माहिती घेतात आणि त्याचा लेखनात योग्य वापर करतात.

जाणून घेऊया!

शिक्षकांनी **नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद आणि क्रियाविशेषण याबाबत विविध उदाहरणाद्वारे चर्चा करावी. त्यानंतर** खालील परिच्छेद विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावा.

• खालील परिच्छेद वाचा.

शाळा सुटताच मुले शाळेबाहेर आली. शाळेच्या फाटकासमोर काही मुलांचे पालक उभे होते. रस्त्यावर वाहनांची गर्दी होती. मुलांसाठी वाहने थांबली. मुलांनी रस्ता ओलांडला.

अधोरेखित केलेले शब्द शिक्षकांनी/विद्यार्थ्यांनी फळ्यावर लिहून त्यांचे निरीक्षण करायला सांगावे.

सक्षम बनूया

वरील अधोरेखित शब्द स्वतंत्र नाहीत. -बाहेर, -समोर, -वर, -साठी हे शब्द अनुक्रमे शाळा, फाटक, रस्ता, मुले या शब्दांना जोडून आले आहेत, म्हणून ती **शब्दयोगी अव्यये** आहेत. -पूर्वी, -पुढे, -आधी, -नंतर, -पर्यंत, -आत, -बाहेर, -मागे, -मुळे, -शिवाय हीदेखील शब्दयोगी अव्यये आहेत.

शिक्षक आणि विद्यार्थी यांनी विविध उदाहरणांद्वारे 'शब्दयोगी' **अव्यय म्हणजे काय याची व्याख्या तयार करून फलकावर लिहावी.**

नाम आणि सर्वनामाला अशा जोडून येणाऱ्या शब्दाला शब्दयोगी अव्यय म्हणतात.

- **शब्दयोगी अव्यये व क्रियाविशेषण अव्यये यांतील फरक.**

खालील दोन गटांतील वाक्ये वाचा.

गट १	गट २
(१) मी रोज सकाळी सहा**पूर्वी** उठतो.	(१) **पूर्वी** राजेशाही होती.
(२) तो आरशा**समोर** उभा होता.	(२) माझा मित्र **समोर** उभा होता.
(३) डोंगरा**वर** हिरवेगार गवत उगवले होते.	(३) ताईने **वर** पाहिले.

वरील दोन्ही गटांत 'पूर्वी, समोर, वर' हे शब्द दिसतात. पहिल्या गटात ते शब्दांना जोडून आले आहेत, म्हणून ती **शब्दयोगी अव्यये** आहेत. दुसऱ्या गटात ते स्वतंत्रपणे आले असून वाक्यांतील क्रियापदांबद्दल विशेष माहिती सांगतात, म्हणून ती **क्रियाविशेषण अव्यये** आहेत.

अशाप्रकारे शिक्षकांनी चित्र आणि उदाहरण यांच्या सहाय्याने विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावे की एकच शब्द हा **क्रियाविशेषण** आणि शब्दयोगी म्हणून वापरला जातो. वाक्यातील अर्थावरून तो भेद लक्षात आणून द्यावा.

सराव करू या!

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सूचना द्याव्यात की,

- खालील वाक्यांतील शब्दयोगी अव्यये ओळखा आणि ती कोणत्या शब्दांशी जोडली गेली आहेत ते लिहा.

१. त्याचे घर शाळेसमोर आहे.

२. मी जेवणानंतर खेळायला जातो.

३. ललितने झाडावर चढून आंबे तोडले.

४. आपण देशासाठी वेळ देणार आहोत की नाही?

५. घराबाहेर जाताना सर्व दिवे आणि नळ आठवणीने बंद करावेत.

कल्पक होऊ या!

खाली दिलेल्या शब्दांचा 'क्रियाविशेषण' आणि 'शब्दयोगी' अव्यय असा दोन्ही प्रकारे उपयोग करून प्रत्येकी दोन वाक्ये लिहा. शक्य झाल्यास प्रत्येक वाक्यासाठी एक चित्रही काढा.

समोर, पूर्वी, मागे, खाली, जवळ, बाहेर, पुढे, नंतर

दिवस - वीस

क्षेत्र – - भाषाभ्यास / व्याकरण

क्षमता/कौशल्य- वाचन- लेखन

संकल्पना – उभयान्वयी अव्यय

अध्ययन निष्पत्ती :- विद्यार्थी 'उभयान्वयी अव्यय' **या घटकाची माहिती घेतात आणि त्याचा लेखनात योग्य वापर करतात.**

जाणून घेऊया!

शिक्षकांनी **नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद आणि क्रियाविशेषण, शब्दयोगी याबाबत उदाहरणाद्वारे चर्चा करावी. नंतर** खालील वाक्ये विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावीत.

- सुशांत आणि सीमा रोज व्यायाम करतात.
- यास्मीनने झाडांना पाणी दिले आणि फाटकाला कुलूप लावले.
- हत्ती किंवा उंट यापैकी कोणत्याही एका प्राण्याचे चित्र काढा.
- त्याने पेन व पेन्सिल कंम्पासपेटीमध्ये ठेवले.

अधोरेखित केलेले शब्द फळ्यावर लिहून त्यांचे निरीक्षण करायला सांगावे.

सक्षम बनूया !

शिक्षकांनी खालील परिच्छेद विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावा.

• खालील परिच्छेद वाचा.

नंदा आणि आई मंडईत पोहोचल्या अन् पावसाची रिमझिम सुरू झाली. आई नंदाला म्हणाली, ''तू कांदे, बटाटे व लसूण घे, तोपर्यंत मी भाजीपाला घेते.'' आईने भाजीपाला खरेदी केला, शिवाय फळेही घेतली. नंदाने आईला विचारले, ''आई, लसूण घेऊ की आले घेऊ?'' आई म्हणाली, ''दोन्ही घे; पण लवकर आवर, कारण जोराचा पाऊस सुरू होईल. पाऊस आला, तर आपण भिजू; म्हणून तुला 'घाई कर' असं सांगते आहे.'' नंदा म्हणाली, ''कशाला एवढी चिंता करतेस? आपण रिक्षा किंवा बसने घरी जाऊ, म्हणजे आपण पावसात भिजणार नाही.''

शिक्षक आणि विद्यार्थी यांनी विविध उदाहरणांद्वारे चर्चा करून **'उभयान्वयी अव्यय' म्हणजे काय याची** खालीलप्रमाणे **व्याख्या तयार करून फलकावर लिहावी.**

'उभय' म्हणजे दोन आणि 'अन्वय' या शब्दाचा अर्थ संबंध असा आहे. दोन शब्द किंवा दोन वाक्ये यांचा संबंध जोडणे, हे उभयान्वयी अव्ययाचे मुख्य कार्य आहे.

आम्ही उभयान्वयी

सराव करू या!

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सूचना द्याव्यात की,

खालील वाक्यांतील उभयान्वयी अव्यये ओळख आणि ती कोणत्या शब्दांना जोडतात ते लिहा.

१. त्याचे घर आणि शाळा समोरासमोर आहे.

२. मी जेवतो व खेळायला जातो.

३. ललित झाडावर चढून आंबे काढ किंवा खाली पडलेले वेचून टोपलीत ठेव.


४. आपण देशासाठी वेळ देणार आहोत की नाही?

५. घराबाहेर जाताना सर्व दिवे आणि नळ आठवणीने बंद करावेत.

६. बाबा नेहमीच बचत करतात; पण स्वतःसाठी खर्च करत नाहीत.

कल्पक होऊ या!

तुम्हाला माहीत असलेल्या सर्व उभयान्वयी अव्ययांची एक मोठी माळ तयार करा आणि वर्गातील भिंतीवर लावा.



दिवस -

एकवीस

क्षेत्र – भाषाभ्यास / व्याकरण

क्षमता / कौशल्य - वाचन- लेखन

संकल्पना – केवलप्रयोगी अव्यय

अध्ययन निष्पत्ती :- विद्यार्थी 'केवलप्रयोगी अव्यय ' या घटकाची माहिती घेतात आणि त्याचा लेखनात योग्य वापर करतात.

जाणून घेऊया!

शिक्षकांनी **नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद आणि क्रियाविशेषण, शब्दयोगी, उभयान्वयी अव्यय याबाबत चर्चा करावी.**

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सूचना द्याव्यात की, खालील चित्र पहा आणि त्याखालील वाक्य वाचा.



सक्षम बनूया !

शिक्षकांनी खालील परिच्छेद विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावा.

शाबास! मोहिनी. मस्त खेळत आहेस. पळपळ. थोडा वेळ शिल्लक आहे. आऊट होऊन कोस. हुर्रे! अरे जिंकलो आपण. वा! वा! मुलांनो, सर्वचजण छान खेळलात रे.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी चर्चा करून 'केवलप्रयोगी' अव्ययाची व्याख्या तयार करावी.

अबब, अहाहा, वा, शाबास, बापरे, आई गं, अहं, छे..... ही काही केवलप्रयोगी अव्यये आहेत.

वरील परिच्छेदात आलेले केवलप्रयोगी शब्द कोणते ते विद्यार्थ्यांना लिहायला सांगावेत.

सराव करू या!

शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून खालील वाक्यात योग्य केवलप्रयोगी अव्यये लिहून वाक्य पूर्ण करून घ्यावीत. तसेच यापेक्षा अधिक वाक्यांचाही सराव करून घेऊ शकता.

१. ..... किती टवटवीत आहेत ही फुले!

२. ..... पडलास का रे?

३. ..... किती मळवलीस रे कपडे!

४. ..... पहिला क्रमांक आला ना? अभिनंदन!

५. ..... तो बघ वाघ!

खालील केवलप्रयोगी अव्यये वापरून प्रत्येकी दोन दोन वाक्ये तयार करा आणि लिहा.


अबब, अहाहा, वा, शाबास, बापरे, आईगं, अहं, छे.....

कल्पक होऊ या!

आणखी काही ऐकलेली / वाचलेली केवलप्रयोगी अव्ययांचा संग्रह करा.

त्यांपासून वेगवेगळी वाक्ये तयार करा.

केवलप्रयोगी अव्ययांचे तरंग/झुंबर तयार करा आणि वर्गातील भिंतीवर लावा.



दिवस - बावीस

क्षेत्र – भाषाभ्यास / व्याकरण

क्षमता / कौशल्य - वाचन- लेखन

संकल्पना – वाक्य आणि वाक्यांचे प्रकार - भाग १

अध्ययन निष्पत्ती : - विद्यार्थी 'वाक्ये आणि वाक्यांचे प्रकार' या घटकाची माहिती घेतात आणि त्याचा लेखनात योग्य वापर करतात.

जाणून घेऊया!

शिक्षकांनी काही वाक्ये फळ्यावर लिहावी / वाक्यपट्टी दाखवावी.

विद्यार्थ्यांकडून ती वाक्ये वाचून घ्यावी.

वाक्यातील कर्ता आणि क्रियापद ओळखायला सांगावे/ स्वतः सांगावे.

वाक्य म्हणजे काय त्यावर चर्चा घ्यावी. अंतिमतः व्याख्या बनवावी.

सुसंगत अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्दसमूहाला 'वाक्य' म्हणतात.

सक्षम बनूया !

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वाक्याचे भाग आणि प्रकार क्रमाक्रमाने सोदाहरण समजावून सांगावेत.

- वाक्याचे मुख्यतः दोन भाग पडतात.

१. उद्देश्य - ज्यांच्याविषयी सांगितले आहे (कर्ता)

२. विधेय - जे सांगितले आहे (कर्म + क्रियापद)

- वाक्यांचे विविध प्रकार पडतात.

विधानार्थी	उद्गारार्थी
प्रश्नार्थी	आज्ञार्थी

सराव करू या!

पुढील वाक्यातील उद्देश्य आणि विधेय ओळखा.

१. आईने मोठमोठ्या भाकरी केल्या.

२. ज्ञानेश्वर महाराज यांची समाधी आळंदीला आहे.

३. माझे निळे पेन ताईने घेतले.

४. लेखक डोंगरावरील जमिनीचे निरीक्षण करू लागले.

खाली दिलेल्या वाक्याचा प्रकार ओळखा.

१. व्यायामाने आरोग्य चांगले राहते.

२. काय गं, कसा आणलास गहू?

३. अरेरे! खूपच लागलं आहे.

४. व्यायाम करा. आरोग्य

कल्पक होऊ या!

शब्दखेळ

दोन गट करा. एका गटाने कोणतेही एक वाक्य सांगावे आणि दुसऱ्या गटाने त्या वाक्यातील उद्देश्य आणि विधेय ओळखावे. याचप्रमाणे एका गटाने वाक्य सांगावे व दुसऱ्या गटाने वाक्याचा प्रकार ओळखावा. अशा प्रकारे भेंड्या लावून गटाला प्रोत्साहन द्यावे.

दिवस -
तेवीस

क्षेत्र – भाषाभ्यास / व्याकरण

क्षमता/कौशल्य- वाचन- लेखन

संकल्पना - वाक्य आणि वाक्यांचे प्रकार–भाग-२

अध्ययन निष्पत्ती :- विद्यार्थी 'वाक्ये आणि वाक्यांचे प्रकार' या घटकाची माहिती घेतात आणि त्याचा लेखनात योग्य वापर करतात.

जाणून घेऊया!

शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून काही वाक्ये वाचून घ्यावीत; त्यातील उद्देश्य व विधेय ओळखायला सांगावेत.

१. आईने मोठमोठ्या भाकरी केल्या. २. ज्ञानेश्वर महाराज यांची समाधी आळंदीला आहे.

३. माझे निळे पेन ताईने घेतले.४. लेखक डोंगरावरील जमिनीचे निरीक्षण करू

५. उंदराने डोक्यात टोपी घालून नाच केला.

शिक्षकांनी फळ्यावर आणखी काही वाक्ये लिहावीत आणि वाक्यातील प्रकार ओळखायला सांगावेत.

१. व्यायामाने आरोग्य चांगले राहते. २. काय गं, कसा आणलास गहू?

३. अरेरे! खूपच लागलं आहे. ४. व्यायाम करा. आरोग्य सांभाळा.

५. तू व्यायाम करतो की नाही?

सक्षम बनूया !

याशिवाय वाक्याचे आणखी काही प्रकार असतात हे शिक्षकांनी विदयार्थ्यांना खालीलप्रमाणे समजावून सांगावे.

केवलवाक्य - केवल वाक्यात एकच विधान असते. त्यामुळे यामध्ये एकच उद्देश्य आणि एकच विधेय असते.

केवलवाक्य हे आज्ञार्थी, विधानार्थी, प्रश्नार्थी, होकारार्थी किंवा नकारार्थी यांपैकी कोणत्याही प्रकारातील असू शकते. उदा.

- मी रोज सूर्यनमस्कार करते.
- तुला बागकाम आवडते का?
- मकरंद, तू लिहिलेला निबंध वाच.

मिश्र वाक्य - मिश्र वाक्यांत दोन किंवा अधिक वाक्ये असतात, जी एकमेकांवर अवलंबून असतात. अर्थाच्या दृष्टीने स्वतंत्र असणारे वाक्य 'मुख्य वाक्य' असते, तर मुख्य वाक्यावर अवलंबून असणारे वाक्य गौण वाक्य असते. उदा.

- जेव्हा वेळ मिळेल तेव्हा मी बागेत जाईल.
- आकाशात ढग जमले की मोर नाचू लागतात.
- नियमित अभ्यास केला तर परीक्षेच्यावेळी गडबड होत नाही.

कधी कधी एका मुख्य वाक्यावर एक किंवा अधिक गौण वाक्ये अवलंबून असतात. ही गौण वाक्ये उभयान्वयी अव्ययांनी एकमेकांना जोडलेली असतात.

संयुक्त वाक्य - संयुक्त वाक्यांत दोन वाक्ये असतात. ती दोन वाक्ये उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात; पण ती स्वतंत्र असतात. म्हणजे ती दोन केवलवाक्ये असतात. अर्थाच्या दृष्टीने ती एकमेकांवर अवलंबून नसतात. यालाच जोडवाक्य असेही म्हणतात.

- रईसा रोज सकाळी घरकामात मदत करते आणि सायंकाळी अभ्यास करते.
- तिने घडलेल्या सर्व घटना सांगितल्या; परंतु तरीही त्यांचे समाधान झाले नाही.

सराव करू या!

- वाक्यांचे प्रकार ओळखा.

१. पाऊस आला की शेतकरी पेरणीला लागतो.

२. मंदा खो खो खेळेल किंवा समूहगीतामध्ये भाग घेईल.

३. माझे बोलून झाले की मग तू बोल.

४. जेवढी भूक लागते तेवढेच खाणे म्हणजे प्रकृती.

५. आपल्या जेवणातील दोन घास भुकेलेल्यांना खाऊ घालावेत.

कल्पक होऊ या!

- एका मोठ्या तक्त्यावर वाक्याचे प्रकार आणि संबंधित उदाहरणे लिहा.
- 'मिश्र वाक्ये आणि संयुक्त वाक्ये यांतील फरक' यावर आपल्या मित्रांमध्ये चर्चा करा.

दिवस -चोवीस

क्षेत्र – - भाषाभ्यास / व्याकरण

क्षमता/कौशल्य- वाचन- लेखन

संकल्पना - शुद्धलेखनाचे नियम

अध्ययन निष्पत्ती :- विद्यार्थी 'शुद्धलेखनाचे नियम' या घटकाची माहिती घेतात आणि त्याचा लेखनात योग्य वापर करतात.

जाणून घेऊया!

शिक्षकांनी विदयार्थ्यांकडून पुढील शब्द वाचून घ्यावेत. निरीक्षण करून असलेले बदल विचारावेत/ लक्षात आणून द्यावेत.

चूक, फूल, गरीब, विहीर, बहीण	चुका, फुले, गरिबी, विहिरी, बहिणी

सक्षम बनूया !

- शिक्षकांनी शेवटचे आणि शेवटून दुसरे अक्षर यांकडे लक्ष वेधून घ्यावे. शब्दातील शेवटचे अक्षर दीर्घ स्वरान्त असेल, तर त्या आधीच्या उपांत्य अक्षरातील इकार व उकार ह्रस्व लिहितात हे सोदाहरण सांगावे.


भिडू, जिना, पिता, बिया, लिली, पहिली,
महिमा, खजिना, फुली...

- जेव्हा मराठी शब्दांतील शेवटच्या अक्षरात कान, मात्र, वेलांटी, उकार दर्शविलेले नसतात, तेव्हा शेवटून दुसऱ्या अक्षरातील इकार, उकार दीर्घ असतात हे सोदाहरण सांगावे.

लसूण हरीण गूळ पाऊल विहीर ऊस

सराव करू या!

- शिक्षकांनी विदयार्थ्यांना खालील चित्रांची नावे लिहायला सांगावीत.






....

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून किमान दहा शब्दांचे श्रुतलेखन करून घ्यावे व तपासावे.

कल्पक होऊ या!

पुढे काही शब्द दिले आहेत. त्यांची वेलांटी किंवा उकार बदलले तर होणारा अर्थबदल जाणून घ्या /वहीत नोंदवा.



दिवस -
पंचेवीस

कौशल्य :- वाचन लेखन
क्षेत्र :- वाचन
क्षमता:- वाचन,लेखन,संभाषण
संकल्पना - समजपूर्वक वाचन करून मत मांडणे

अध्ययन निष्पत्ती :- 1.दिलेल्या उताऱ्याचे समजपूर्वक वाचन करून त्यात सहभागी होऊन आपले मत मांडतात .
2.वाचलेल्या साहित्यावर चिंतन करून अधिक चांगल्या पद्धतीने आकलन होण्यासाठी चर्चा करतात.

जाणून घेऊया

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील उताऱ्याचे वाचन करण्यास सांगावे व उताराच्या अनुषंगाने गटात चर्चा करण्यास सांगून पुढे दिलेल्या प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांकडून सोडून घ्यावी व त्यांच्या संकल्पना जाणून घ्याव्या.

शाळेच्या परिसरात असलेल्या निंबाच्या झाडावर सुगरण पक्षी घरटे बांधत होता. अतुल, नयना, जॉन व सिमरन रोज तेथे थोडावेळ थांबायचे. सुगरण पक्षी कसे घरटे बांधतो याचे निरीक्षण करायचे. त्याच्या हालचाली त्यांचे मन मोहून टाकायच्या. 'कुठे घाई नाही, गडबड नाही, सगळे कसे नियोजनबद्ध.' असे नयना नेहमी म्हणायची. तिला त्याच्या कामातला सफाईदारपणा, नीटनेटकेपणा आवडायचा. जॉनला त्याची चिकाटी तर अतुलला त्याची कष्टाळूवृत्ती भावून जायची. सिमरनला वाटायचे, 'किती मेहनती आहे हा पक्षी! आपल्या सुगरणीसाठी व पिलांसाठी एवढे सुरेख घरटे बांधतो. त्यासाठी अपार मेहनत घेतो. खरंच खूपच जबाबदार व कुटुंबवत्सल पक्षी आहे हा !'

1.वरील परिच्छेदात आलेल्या मुला -मुलींची नावे.

2.वरील परिच्छेदात वर्णन केलेल्या सुगरण पक्षाचे विशेष गुण.

सक्षम बनू या.

शिक्षकांनी ही संकल्पना दृढ होण्यासाठी आणखी काही उतारे देऊन विद्यार्थ्यांना गटात चर्चा करण्यास सांगावे.

जंगलातून फिरताना आपल्याला अनेक आवाज ऐकू येतात. उंच उंच गवतातून पाण्याकडे येणारे हिंस्र प्राणी पाहून पक्षी मोठ्याने आवाज करत उंच उडतात, तर शिकार होणारे प्राणी– जसे हरिण, सांबर व काळवीट मोठ्या आवाजात ओरडत धोक्याची सूचना देतात.

वन्य प्राण्यांच्या पावलांचे ठसे, शिकार करण्याची पद्धत, विष्ठा व झाडा–झुडपांवरील त्यांच्या नख्यांच्या खुणा, दातांच्या खुणा, त्यांचे विविध आवाज यांवरून त्यांची आपल्याला ओळख होते. ही एक प्रकारची अरण्यलिपीच होय.

जंगलवाचनाचा आपल्याला छंद लागला, की डोळ्यांनी, कानांनी, नाकाने आपण प्राण्यांच्या अनेक गोष्टी जाणतो. प्राण्यांचे आवाज, पायांचे ठसे, वास आपल्याला प्राण्यांच्या जगाशी एकरूप करतात. ओढा, नदीकाठ, माळरान, डोंगरदऱ्या, ओहळ, झाडेझुडपे या सगळ्यांशी जवळीक निर्माण होते. कुठलेही जंगल आपल्याला कंटाळवाणे वाटत नाही, कारण जंगलवाचनाचा अनुभव आपल्याला नवीनवी माहिती आणि वेगळ्याच स्वरूपाचा आनंद मिळवून देतो.

कृती सोडवा.

1.परिच्छेदात आलेल्या प्राण्यांची नावे.

2.प्राण्यांच्या जगाशी एकरूप करणारे घटक.

चला सराव करूया.

1.जंगलात कोणते प्राणी धोक्याची सूचना देतात?

2.तुमच्या घरी व शेजारी असलेल्या प्राण्यांच्या कृतीचे व आवाजाचे निरीक्षण करून तुमचे अनुभव **लिहा.**

कल्पक होऊया.

तुमच्या परिसरातील पाच प्राण्यांच्या पावलांचे किंवा पावलांच्या ठशांचे निरीक्षण करा व ते प्राणी तुम्ही कसे ओळखले ते मित्रांना सांगा.

पक्षी निरीक्षणावरील पुस्तके मिळवा व वाचा.

दिवस -
सव्वीस

कौशल्य :-वाचन लेखन
क्षेत्र : वाचन
क्षमता : वाचन लेखन संभाषण
संकल्पना- प्रकट व मूकवाचन

अध्ययन निष्पत्ती;-1.दिलेल्या उताऱ्याचे योग्य गतीसह समजपूर्वक प्रकट वाचन व मूकवाचन करतात .
2.एखादा मजकूर वाचताना तो समजून घेण्यासाठी आवश्यकतेनुसार शिक्षकांची मदत घेतात.

जाणून घेऊया.

दिलेल्या उताऱ्याचे प्रकटवाचन व मूकवाचन विद्यार्थ्यांकडून शिक्षकांनी करून घ्यावे, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना परमवीर चक्र या विषयाची माहिती देऊन योग्य मार्गदर्शन करावे व त्यांच्या संकल्पना जाणून घ्याव्या .

पुरातन काळातील वीर पुरुषांच्या असामान्य पराक्रमांच्या कथा तुम्ही ऐकल्या असतील; पण आपल्या सर्वांच्या सुरक्षिततेसाठी स्वतःच्या प्राणांची आहुती देणारे शूर सैनिक आजही आपल्या देशात आहेत. त्यांच्या अतुलनीय शौर्याला वंदन करण्यासाठी त्यांना सन्मानपदके देऊन गौरवले जाते.

'परमवीर चक्र' हा भारताचा सर्वोच्च लष्करी सन्मान आहे. जमिनीवर, समुद्रात किंवा आकाशात शत्रू समोर उभा ठाकलेला असताना केवळ अजोड असे धाडस, शौर्य दाखवणाऱ्या, आत्मसमर्पण करणाऱ्या वीरांना तो प्रदान केला जातो.'परमवीर चक्र' हा फार दुर्लभ सन्मान आहे. आतापर्यंत फक्त एकवीस वेळाच हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे. त्यातील चौदा वीरांना तर तो मरणोत्तर देण्यात आला आहे.

सक्षम बनूया.

परमवीर चक्र' पदक दिसायला अगदी साधे आहे. कांस्य धातूपासून बनवलेले, छोट्या आडव्या दांडीवर सहज फिरेल असे. गडद जांभळी कापडी पट्टी हे त्याचे वैशिष्ट्य. पदकाच्या दर्शनी बाजूला मधोमध भारताचे राष्ट्रीय बोधचिन्ह आहे. पदकाच्या मागच्या बाजूला परमवीर चक्र हे शब्द इंग्रजी आणि हिंदीत गोलाकार कोरलेले आहेत. त्यांच्या मधे दोन कमलपुष्पे आहेत. 'परमवीर चक्र' पदकाचे डिझाइन सावित्रीबाई खानोलकर यांनी तयार केले. त्या मूळच्या युरोपियन; परंतु भारतीय सेनेतील एक अधिकारी विक्रम खानोलकर यांच्याशी विवाह करून त्या भारतात आल्या. या देशावर त्यांचे प्रचंड प्रेम. त्यांनी भारतीय नागरिकत्व तर घेतलेच, शिवाय भारतातील कला, परंपरांचाही खूप अभ्यास केला. मराठी, संस्कृत, हिंदी या भाषा त्या अस्खलितपणे बोलत असत.

चला सराव करूया



कल्पक होऊ या.

1. परमवीर चक्राचे चित्र काढा व रंगवा .
2. आंतरजालावरून आपल्या परमवीर यांचे चित्र मिळवा चित्र ,नाव व पाच-सहा वाक्यात त्यांची माहिती या पद्धतीने चि**क**वही**त चिटकवा.**

दिवस -
सत्तावीस

क्षेत्र-वाचन
क्षमता/कौशल्य :- वाचन- भाषण
संकल्पना-सामाजिक समस्यांवर स्वतःचे विचार मांडणे

अध्ययन निष्पत्ती ;-परिसरातील सामाजिक समस्यांची जाणीव निर्माण होऊन त्याबाबत योग्य विचार मांडतात .

जाणन घेऊ या

खालील उतार्‌याचे स्वतः किंवा विद्यार्थ्यांकडून प्रकट वाचन करून घ्यावे, उतार्‌यातील घटनाक्रमाने सांगण्याची सूचना द्यावी .घटनाक्रम सांगताना योग्य ते मार्गदर्शन करावे. प्रश्नोत्तराच्या माध्यमातून मते जाणून घ्यावी.

पावसाळ्याचे दिवस होते.. गावातल्या सोना नदीला भरपूर पाणी आले होते .पावसामुळे नदीचा प्रवाह वाढत होता .कुंदा आणि तिच्या मैत्रिणी नदीच्या काठावर खेळायला गेल्या होत्या .कुंदा वयाच्या आठव्या वर्षी पोहायला शिकली होती .नदीकाठच्या कडुनिंबाच्या मोठ्या झाडाखाली सगळ्या मैत्रिणी हसत बागडत खेळत होत्या .खेळता खेळता लहानगी रजिया व नीला नदीकडे केव्हा गेल्या, ते कळलेच नाही तिकडे कुंदा व तिच्या मैत्रिणी खेळण्यात दंग होत्या .एवढ्यात नीला चा मोठ्याने रडण्याचा ओरडण्याचा आवाज आला .धावा! धावा !लवकर या , रजिया पाण्यात पडली .'कोणीतरी वाचवा हो !'ही हाक कुंदाच्या कानावर पडल्या बरोबर ती धावतच नदीकिनारी पोहोचली. रजिया पाण्यात गटांगळ्या खात पाण्याच्या प्रवाहाबरोबर पुढे पुढे वाहत चालली होती .

कुंदा ने क्षणात नदीच्या पात्रात उडी घेतली व सरसर पोहत नदीच्या दिशेने निघाली तोवर आजूबाजूचे लोक जमा झाले. कुंडाने रझियाला काठाकडे आणले. लोकांनी मोठा दोर पाण्यात सोडला होता. कुंदा ने त्याला धरले . सर्वांनी या दोघींना बाहेर काढले .ही बातमी गावभर पसरली. सार्‌या गावात कुंदाच्या साहसाचीच चर्चा होती.

एका वाक्यात उत्तरे लिहा.

- कुंदा केव्हा पोहायला शिकली होती ?
- **कुंदाला** नदीवर कोणते दृश्य दिसले?
- उतारा वाचून तुम्हाला कुंदाचे कोणते गुण जाणवले ते लिहा .

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील घटना वाचल्यानंतर आपले विचार लिखित स्वरूपात मांडण्याकरता प्रोत्साहित करावे व प्रसार माध्यमांद्वारे प्रसारित करण्याकरिता योग्य मार्गदर्शन करावे .

कुंदाचे अभिनंदन करणारा कोणता संदेश तुम्ही भ्रमणध्वनीवरून पाठवाल ते खालील चौकोनात लिहा.

तुम्ही स्वतः पाहिलेली व ऐकलेली अशा प्रकारची साहसी कथा किंवा घटना याचे विद्यार्थ्यांला वर्गात कथन करावयास सांगावे.

चला सराव करूया

तुम्ही रजियाचे हितचिंतक आहात ,या नात्याने तिला कोणत्या सूचना द्याल.

कल्पक होऊ या.

आंतरजालाचा उपयोग करून भारतीय जलतरणपटू यांची माहिती घ्या .खेळाडूंचे चित्र चिटकवून प्रत्येक खेळाडूची माहिती चार पाच वाक्यात लिहा.

दिवस -
अठ्ठावीस

क्षेत्र :वाचन
क्षमता :वाचन ,लेखन, संभाषण
संकल्पना -विविध कलांचा आनंद घेणे.

अध्ययन निष्पत्ती ;-1.विविध कला यासंबंधी जिज्ञासा व्यक्त करतात आणि त्याचा आनंद घेतात.
2. विविध साहित्य प्रकारात लिहिलेल्या लेखन साहित्याचे आरोह-अवरोह योग्य गतीने वाचन करतात .

जाणून घेऊ या

आई : अरे जॉर्डन, किती हा तुझ्या कपड्यांचा ढीग ?
जॉर्डन : आई, काय करू मी या जुन्या कपड्यांचं ?
आई : मुळात आवश्यक आहे तेवढेच नवीन कपडे घ्यावेत. त्यांचा पुरेपूर वापर करावा.
जॉर्डन : अगं हो, पण आता काय करू ते सांग ना!
आई : यातले जे कपडे वापरण्यासाठी चांगले आहेत, ते बाजूला कर. जे तुझ्या अंगाला येत नाहीत, जे फाटले आहेत ते वेगळे वेगळे कर.
जॉर्डन : आई, आपण या जुन्या कपड्यांचा पुनर्वापर करू शकतो का ?
आई : हो, नक्कीच. त्यासाठी आपल्यात फक्त कलात्मकता पाहिजे.
जॉर्डन : आई, काय काय बनवता येईल गं या कपड्यांचं ?
आई : तुला सुट्टी आहे ना आज, चल आपण दोघं मिळून बनवूया.
(आई जॉर्डनला पर्स, तोरण, पायपुसणी बनवून दाखवते.)
जॉर्डन : आई, किती छान झाल्यात गं या वस्तू. खूपच छान दिसत आहेत. खरंच, आपण जुन्या कपड्यांपासून वेगवेगळ्या सुंदर वस्तू बनवू शकतो. यामुळे नक्कीच जुन्या कपड्यांचा पुनर्वापर होईल.

सक्षम बनूया.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून या उतार्‌याचे संवाद रूपात सादरीकरण करून घ्यावे . वरील उतार्‌याचे योग्य गतीने विद्यार्थ्यांकडून प्रकट वाचन करावे .विद्यार्थ्यांना संवाद कितपत समजला आहे हे शिक्षक जाणून घेतील.

वरील उतारा विद्यार्थ्यांनी समजपूर्वक वाचल्यानंतर शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून वेगवेगळ्या टाकाऊ वस्तूंपासून विविध कल्पक वस्तू तयार करून घ्याव्यात ;त्या वस्तू तयार केल्या नंतर त्यांचे अनुभव वर्गात सादर करून घ्यावेत व संवादात्मक शैलीने अनुभवकथन लिहिण्यासाठी योग्य मार्गदर्शन करावे.

चला सराव करू

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारून, विचारप्रवृत्त करून बोलते करावे .

1.आवश्यक तेवढे कपडे खरेदी केल्यानंतर कोणते फायदे होतील असे तुम्हाला वाटते?

कल्पक होऊ या .

1.जुन्या कपड्या पासून विविध वस्तू तयार करा.

दिवस :
एकोणतीस

क्षेत्र :- वाचन
क्षमता :- वाचन,लेखन,भाषण
संकल्पना - सर्जनात्मक लेखन

अध्ययन निष्पत्ती ;-1.घर, शाळा ,समाज व परिसर यामध्ये होणाऱ्या विविध उपक्रमात सहभागी होतात.
2. दैनंदिन जीवनातील एखादा वैशिष्ट्यपूर्ण घटना स्थिती अनुभव यावर विविध प्रकारे सर्जनात्मक लेखन

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना 5 जून या जागतिक 'पर्यावरण दिन' याविषयी ची माहिती वाचण्यास सांगावी .विद्यार्थ्यांकडून शाळेमध्ये होणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्याकरता विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे; त्याचप्रमाणे उपक्रमाबद्दलची माहिती विद्यार्थ्यांच्या चर्चेतून जाणून घ्यावी.

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून खालील कृती सोडवून घ्याव्यात.

- तुमच्या शाळेत पर्यावरण दिन साजरा करायचा आहे खालील आकृतीत काही मुद्दे दिले आहे याबाबत तुम्ही काय विचार कराल ?ते लिहा ?



सराव करूया.

तुमच्या शाळेत स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन सोहळ्याचे काही मुद्दे खाली दिले आहेत .त्याचे निरीक्षण करा आणि त्याआधारे तुमच्या शाळेतील क्रीडा स्पर्धेची माहिती लिहा.

कल्पक होऊया.



दिवस –तीस

चाचणी क्रमांक - 2

विद्यार्थ्याचे नाव - ----------

प्रश्न 1- पुढे दिलेल्या ओळी वाच व त्यातील एक म्हण व एक वाक्प्रचार शोधून लिही.(गुण-02)

आता कुठे दिवस वर यायला लागला होता. तिच्या अंगातून घामाच्या धारा निघत होत्या. खांद्याला अडकवलेल्या पर्समध्ये ती पाण्याची बाटली शोधू लागली. सगळे कप्पे तीने उघडून पाहिले. पण तिला पाण्याची बाटली काही सापडली नाही. निराश होऊन ती झाडाच्या बुंध्याशी रेलून बसली. तेव्हा तिच्या लक्षात आले की; पाठीला अडकवलेल्या सॅकमध्ये पाण्याची बाटली आहे. ती हसली आणि म्हणाली, "काखेत कळसा नि गावाला वळसा."

1) उताऱ्यातील एक म्हण ---------- (1)

2) उताऱ्यातील एक वाक्प्रचार ---------- (1)

प्रश्न 2- पुढील क्रियाविशेषणे वापरुन वाक्ये तयार कर. (गुण-02)

1) हळूहळू ---------- (1)

2) नेहमी ---------- (1)

प्रश्न 3- खालील वाक्यांत कंसातील योग्य केवलप्रयोगी शब्द लिही. (गुण-02)

(बापरे, अहाहा, आई गं, अबब)

1) ---------- केवढा मोठा देवमासा !

2) ---------- किती सुंदर इंद्रधनुष्य !

प्रश्न 4- पुढील शब्दाचे दोन वेगवेगळे अर्थ लिही. (गुण-02)

अ) मान 1) ---------- 2) ----------

प्रश्न 5- परमवीर चक्राविषयीची माहिती पुढील मुद्दयांच्या सहाय्याने लिही. (गुण-02)

1) परमवीर चक्र या धातूपासून बनवलेले असते. - ----------

2) परमवीरचक्राचे डिझाईन यांनी तयार केले. - ----------

प्रश्न 6- तुला एखादे जुने कापड दिले तर त्यापासून कोणत्या दोन वस्तू बनवशील? (गुण-02)

1) ----------

2) ----------

प्रश्न 7- वाचन प्रेरणा दिन या दिवशी साजरा करतात. - ---------- (गुण-01)

अ) 15 ऑगस्ट ब) 14 जानेवारी क) 15 ऑक्टोबर ड) 14 नोव्हेंबर

दिवस : **एक**तीस

क्षेत्र :- वाचन

क्षमता :- वाचन , लेखन

संकल्पना :- बातमी लेखन

अध्ययन निष्पत्ती - 1.विविध प्रसार माध्यमाद्वारे प्रसारित होणाऱ्या बातम्या ,संवाद समजपूर्वक ऐकतात /वाचतात.

2.वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळ्या उद्देशानुसार लिहिताना शब्द ,वाक्य व वाक्प्रचार यांचा योग्य वापर करतात .

जाणूनघेऊया

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रसारमाध्यमाद्वारे प्रसारित होणाऱ्या बातम्यांचे श्रवण/ वाचन करण्यास सांगावे. खालील दिलेली बातमी वाचून त्या खालील प्रश्नांची उत्तर देण्यास विद्यार्थ्यांना प्रवृत्त करावे.



वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा...



आदर्शनगर, ता. १६ : दि.१५ ऑक्टोबर रोजी साधना विद्यालय, आदर्शनगर येथे वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून विद्यालयात अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात ग्रंथदिंडीने करण्यात आली. आदर्शनगर परिसरातील महत्त्वाच्या चौकांत 'वाचनसंस्कृती वाचवा' या विषयावर मुलांनी पथनाट्ये सादर केली. त्याचबरोबर विद्यालयात 'उत्कृष्ट वाचन' ही स्पर्धा घेण्यात आली. यात मुलांनी त्यांच्या आवडत्या कथा, कवितांचे वाचन केले. या स्पर्धेत इयत्ता सातवीतील शेखर काजळे या विद्यार्थ्यास 'उत्कृष्ट वाचक' म्हणून बक्षीस देण्यात आले. पुढील काळामध्ये वाचनसंस्कृती विकसित व्हावी, या दृष्टीने विद्यालयात विविध उपक्रम राबवले जाणार असल्याचे मुख्याध्यापकांनी या प्रसंगी घोषित केले. विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने वाचन प्रेरणा दिन साजरा केला.

सक्षम बनूया.

विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचे दृढीकरण करण्यासाठी शिक्षकांनी शाळेत झालेल्या विविध उपक्रमांवर बातमी देऊन कृती सोडवून घ्याव्यात.

वरील बातमी वाचून खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

1. कोणाचा जन्म दिवस आपण वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करतो?
2. वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने कोणकोणत्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले?

सराव करूया.

विद्यार्थ्यांमध्ये वाचन कौशल्य वाढावे ,यासाठी शाळेत कोणकोणते उपक्रम आयोजित करता येतील, यावर विद्यार्थ्यांनी गटात चर्चा करा व त्यांची यादी तयार करा.

कल्पक होऊया.

1. विद्यार्थ्यांना एखादा विषय देऊन संबंधित बातम्यांचे संकलन करून वहीत चिकटवण्यात सांगावे .उदाहरणार्थ -क्रीडा.
2. तुमच्या शाळेत पार पडलेल्या शिक्षक दिनाबद्दल बातमी तयार करा.

दिवस –
बत्तीय


क्षेत्र : वाचन
कौशल्य : वाचन , लेखन
संकल्पना - समजपूर्वक वाचन व त्यावर मत मांडणे.

अध्ययन निष्पत्ती 1. सार्वजनिक ठिकाणच्या सूचना समजपूर्वक वाचतात .
2.परिसरातील सामाजिक समस्यांची जाणीव निर्माण होऊन त्याबाबत योग्य विचार मांडतात.

जाणून घेऊ या

एखाद्या गोष्टीची माहिती दुसऱ्यापर्यंत पोहचवण्याचे सूचना हे एक माध्यम आहे .दैनंदिन व्यवहारात अनेक ठिकाणी आपल्याला सूचना द्याव्या लागतात .दुसऱ्याने दिलेल्या सूचना वाचून त्याचा अर्थ समजून घ्यायचा असतो .अपेक्षित कृती योग्य तऱ्हेने होण्यासाठी दिलेल्या सूचनांचे आकलन होण्याचे कौशल्य निर्माण व्हायला हवे.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध परिसरातील सूचनाफलक याचे वाचन करण्यास सांगावे .सूचनाफलक वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांकडून जाणून घ्यावी.



1. पाणी पुरवठा कधी बंद करण्यात येणार आहे?

2. पाणी पुरवठा बंद का ठेवण्यात येणार?

सराव करूया.

खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या :-

1. पाणीपुरवठा बंद राहण्याबाबतची कारणे सांगा ?
2. पाणीपुरवठा कोणत्या दिवशी बंद राहणार आहे ?

'उद्या शहरातील वीज पुरवठा बंद राहील.' या विषयावर सूचनाफलक तयार करा.

सक्षम बनू या.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विषय देऊन सूचनाफलक तयार करण्यास सांगणे त्याकरिता खालील गोष्टी लक्षात ठेवाव्यास सांगणे.

1. सूचना कमीत कमी शब्दात असावी.
2. सूचनेचे लेखन स्पष्ट शब्दात ,नेमके व विषयानुसार असावे .
3. सुचनेतील शब्द सर्वांना अर्थ समजण्यास सोपे असावे .
4. सूचनेचे लेखन शुद्ध असावे.

कल्पक बनू या

1. तुमच्या शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे .हा कार्यक्रम पाहण्यासाठी पालकांना आवाहन करणारा सूचनाफलक तयार करा.
2. सार्वजनिक ठिकाणी ,रस्त्यांच्या दुतर्फा पाणीबचतीच्या संदर्भात आपल्यासाठी काही संदेश लिहिलेले असतात .त्यांचा संग्रह करा .त्यातील तुम्हाला आवडलेल्या संदेशाचे फलक तयार करून शाळेच्या परिसरात लावा.

विषय– 'उद्या शहरातील पाणीपुरवठा बंद राहील.'

नमुना कृती १

दि. ८ नोव्हेंबर

जलपुरवठा विभाग

पाणीपुरवठा बंद

जलपुरवठा विभाग विद्याविहार, पुणे तर्फे कळवण्यात येते, की विद्याविहार या भागातील जलवाहिन्यांच्या महत्त्वाच्या दुरुस्तीच्या कामासाठी १० नोव्हेंबर रोजी पाणीपुरवठा दिवसभर बंद राहील याची नागरिकांनी नोंद घ्यावी.


दिवस –
तेहत्तीस

क्षेत्र-वाचन
क्षमता- श्रवण, वाचन-लेखन
संकल्पना -कवितांचा आनंद घेणे.

अध्ययन निष्पत्ती ;- 1.पाठ्यविषय कविता लक्षपूर्वक ऐकून त्यांचा आनंद घेतात त्यांच्या ध्वनिफिती समजपूर्वक ऐकतात.
2.कविता-गाणी अभिनयासह व योग्य आरोह-अवरोहासह आनंददायी पद्धतीने म्हणतात.

जाणून घेऊ या.

शिक्षकांनी खालील कवितेचे विद्यार्थ्यांकडून तालासुरात सादरीकरण करून घ्यावे. कवितेचा भावार्थ विद्यार्थ्यांकडून जाणून घ्यावा, त्यांना प्रकट होण्याची संधी द्यावी, त्यांची मते जाणून घ्यावी.



माझ्या अंगणात या कवितेत कवी ज्ञानेश्वर कोळी सांगतात की ,शेतकरी शेतात रात्रंदिवस काम करतो तेव्हा त्याच्या शेतात खूप धान्य पिकते . त्याला खूप आनंद होतो प्रस्तुत कवितेतून शेतकऱ्यांच्या मनातील विविध भावनांचे वर्णन कवीने केले आहे.

- कवितेच्या संबंधी काही प्रश्न विचारून शिक्षक ,कविता कितपत समजली हे जाणून घेतील.

सक्षम बनू या.

वरील कवितेच्या मदतीने आपणास काव्य या साहित्यप्रकाराची ओळख झाली. कवितेसंबंधीच्या संकल्पना दृढ करण्यासाठी आपण अजून एका पद्याची ओळख करून घेऊया.

• ऐका. म्हणा. वाचा.



पाऊस आला! पाऊस आला!
ऐन दुपारी विजा चमकल्या
कडाड कडकड भणाण वारा
जिकडे तिकडे गारा, गारा.

पाऊस आला! पाऊस आला!
दिवाळीतला खचला किल्ला
भुंकत सुटली सगळी कुत्री
आजोबांनी शिवली छत्री!

पाऊस आला! पाऊस आला!
'उशीर, त्यातच हा घोटाळा',
बाबा गेले करीत चडफड
आईचेही भिजले पापड.

पाऊस आला! पाऊस आला!
आम्ही केला एकच गिल्ला
हसत म्हणाल्या मॅडम कुट्टी
'चला पळा, शाळेला सुट्टी!'

— विंदा करंदीकर


सराव करू या.

1.पावसामुळे आईचे कोणते नुकसान झाले ?

2.सुटलेला वारा कसा होता?

3.कवितेतील शेवटचे अक्षर सारखी येणारे शब्द कवितेतून शोधा व लिहा .उदाहरणार्थ वारा - गारा

4.वारा' या शब्दाशी संबंधित असलेले शब्द वाचा त्याचा वाक्यात उपयोग करा .



कल्पक होऊ या

1.पावसाची गाणी मिळवा व वर्गात सादर करा.

2.तुम्ही पाहिलेल्या एखाद्या शेताचे वर्णन थोडक्यात लिहा.

दिवस - चौतीस

क्षेत्र:- वाचन

क्षमता:-वाचन,लेखन

संकल्पना- कवितांचा आशय समजपूर्वक समजून घेणे.

अध्ययन निष्पत्ती ;- 1.पाठ्यविषय कविता लक्षपूर्वक ऐकून त्यांचा आनंद घेतात त्यांच्या ध्वनिफिती समजपूर्वक ऐकतात.

2.कविता-गाणी अभिनयासह व योग्य आरोह-अवरोहसह आनंददायी पद्धतीने म्हणतात.

जाणून घेऊ या

शिक्षकांनी खालील कविता तालासुरात आनंददायी पद्धतीने विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्यावी. विद्यार्थ्यांकडून कवितेचा भावार्थ थोडक्यात जाणून घेऊया.कवितेतील ओळींचा अर्थ ,शब्दांचा अर्थ विचारून विद्यार्थ्यांना कविता कितपत समजली हे शिक्षक जाणून घेतील.



सक्षम बनू या.

वरील कवितेत कवी कल्याण इनामदार यांनी आपल्या भोवताली शब्दांचे वापरणे कसे सुंदर आहे याचे वर्णन कवितेत केले आहे .भाषेद्वारे आपण आपले विचार सुख-दुःख व्यक्त करू शकतो; हा विचार मांडला आहे.

सराव करू या.

कवितेसंबंधी च्या संकल्पना दृढ करण्यासाठी शिक्षकांनी आणखी एका पद्याची ओळख करून द्यावी.

• ऐका. म्हणा. वाचा.



घर नाही चार भिंती
घर असते देखण्या कृती,
घर नाही एक वस्तू
घर म्हणजे आनंदी वास्तू.
घर नाही नुसत्या खोल्या
घरात हव्या भावना ओल्या,
घरात हवा जिव्हाळा
घर शिक्षणाची पहिली शाळा.
घर नाही नुसता पसारा
घर नाही केवळ निवारा,
घराला असते कहाणी
घराला असतो आपला चेहरा.
घर शिकवते पाहायला
चालायला, धावायला,
घर शिकवते लढायला
दःखाचा डोंगर चढायला.



1.कवितेतील शेवटचे अक्षर सारखी येणारे शब्द शोधा व लिहा .

2. तुमच्या परिसरातील घराला दिलेली नावे पहा, त्यांची यादी तयार करा.

3. कवितेतील तुम्हाला आवडलेल्या कोणत्याही दोन ओळींचा अर्थ स्पष्ट करा.

कल्पक होऊ या.

1. तुमच्या घराचे चित्र काढून रंगवा व त्याचे सहा ते सात वाक्यात वर्णन करा.

2. घर या विषयाशी संबंधित कवितेचे संकलन करा व थोडक्यात भावार्थ वहीत लिहा**.**

दिवस - पस्तीस

क्षेत्र:- वाचन

क्षमता:-वाचन,लेखन

संकल्पना- जाहिरात लेखन.

अध्ययन निष्पत्ती :- विविध लेखन प्रकारातील आशय समजून घेतात, आशयाशी संबंधित स्वत्:च्या अनुभवावर आधारीत विचार लेखी व तोंडी स्वरूपात व्यक्त करतात.

जाणून घेऊ या!



शिक्षकांनी विद्यार्थ्यांना जाहिरातीचे बारकाईने निरीक्षण करण्यास सांगावे. वरील कृतीच्या आधारे जाहिरात समजून देण्यास मदत करावी. याप्रमाणे मुलांना समजतील अशा अधिक सोप्या विषयावर आधारीत जाहिरातींचे नमुने विद्यार्थ्यांसमोर ठेवून त्यावर आधारीत कृती सोडविण्यास सांगावे.

सक्षम बनूया


शिक्षकांनी स्वतः उत्कृष्ट जाहिरातलेखन कसे करावे याविषयी मार्गदर्शन आणि उदाहरणादाखल जाहिरातीचा नमुना दाखल सादर करावा.

त्यावर आधारित कृती विचारणे, विचार प्रवृत्त करणे, समजपूर्वक वाचन करायला लावणे.

चला सराव करूया :

शिक्षक दुसऱ्या विषयावर जाहिरात देऊन मुलांना तिचे निरीक्षण करायला सांगतील. विद्यार्थी त्यावर आधारित कृती सोडवण्याचा प्रयत्न करतील.

उदा.



कृती.

१. जाहिरात विषय कोणता?

२. 

३ या जाहिरातीतील कोणती गोष्ट तुम्हाला आवडली आणि का? याविषयी तुमचे मत लिहा.

कल्पक होऊया

विद्यार्थांनी वर्तमानपत्रातील जाहिरातीच्या कात्रणाचां संग्रह करून तो वहीत चिकटविणे.

दिवस – छत्तीस

क्षेत्र - लेखन

कौशल्य / क्षमता :- वाचन – लेखन

संकल्पना :वर्णनात्मक निबंधलेखन .

अध्ययन निष्पत्ती :- 1) विविध लेखन प्रकारातील विचार व आशय समजून घेतात, आशयाशी संबंधित सव्त:चे विचार व अनुभव स्वत:च्या भाषाशैलीत लिहीतात. लेखनाचे विविध प्रकार व शैली यांचा उपयोग करुन अनुभव लेखन करतात.
2) विविध लेखन प्रकारातील विचार, आशय समजून घेतात. आशयाशी संबंधित स्वत:च्या अनुभवावर आधारीत तोंडी लेखी स्वरुपात विचार व्यक्त करतात.

जाणून घेऊया






शिक्षकांनी सांगितल्याप्रमाणे वरील चित्राचे निरीक्षण करून विद्यार्थी स्वतःच्या मनातील भावना मुद्याच्या आधारे व्यक्त करतील त्याप्रमाणे सलग लेखन करण्याचा प्रयत्न करतील.

सक्षम बनूया

शिक्षकांनी स्वतः वर्णनात्मक निबंध कसा लिहावा याविषयी मार्गदर्शन करणे.

वाचन.विचार यानुसार विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे,तर्क,निरीक्षण,अनुभव,चर्चा,पूर्वानुभव,

चला सराव करूया:



शिक्षक विद्यार्थ्यांना वरील मुद्यांच्या आधारे प्रश्न विचारतील, विद्यार्थी त्यांच्या अनुभवानुसार लेखन करण्याचा प्रयत्न करतील.

(लिहीते होऊया)

कल्पक होऊया

तुम्हाला आवडणाऱ्या कोणत्याही पाच प्राण्यांची अधिक माहिती आंतरजालाच्या साहाय्याने मिळवणे.

दिवस –सदतीस

क्षेत्र :वाचन,लेखन

कौशल्य/क्षमता :वाचन,लेखन .

संकल्पना : संवादलेखन.

अध्ययन निष्पत्ती : विविध लेखन प्रकारातील विचार,आशय समजून घेतात,आशयाशी संबंधित स्वतःच्या अनुभवावर आधारित साम्य,सहमती वा असहमती व्यक्त करतात.

जाणून घेऊया





शिक्षक विद्यार्थ्यांना पाऊस आणि छत्री हे दोघे काय गप्पा मारत असतील याची कल्पना करायला सांगतात.विद्यार्थी कल्पनेवर आधारित लेखन करण्याचा प्रयत्न करतील .

सक्षम बनूया

शिक्षकांनी स्वतः आकर्षक संवाद साधने आणि संवाद लिहिणे या संकल्पनेविषयी मार्गदर्शन करणे.

विद्यार्थ्यांना परिणामकारक संवाद साधता येणे ,सकारात्मक आणि सुसंवादी बनविणे.





शिक्षक विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगतील .विद्यार्थ्यांना त्यावर आधरित प्रश्न विचारतील .

(चला संवाद लिहूया- नदी व झाड)

शिक्षक विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करून संवाद लिहिण्यास सांगतील.विद्यार्थी स्वकल्पनेने संवाद लिहितील.

कल्पक बनूया

वरील चित्रातील कोणताही एक घटक तुमच्याशी गप्पा मारतोय अशी कल्पना करून तुमच्या शब्दांत संवादलेखन करा

दिवस – अडतीस

क्षेत्र :वाचन,लेखन


कौशल्य/क्षमता :वाचन,लेखन .

संकल्पना : प्रसंगलेखन.

अध्ययन निष्पत्ती : विविध लेखन प्रकारातील विचार,आशय समजून घेतात,आशयाशी संबंधित स्वतःचे अनुभव स्वतःच्या भाषाशैलीत लिहितात.लेखनाचे विविध प्रकार व शैली यांचा उपयोग करून प्रसंग लेखन करतात.

जाणून घेऊया

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील कृतीतील मुद्यांवर विचार करण्यास सांगावे किंवा गटचर्चा करण्यास सांगावी .



सक्षम बनूया

शिक्षक विद्यार्थ्यांना आपली मते वरील मुद्यांच्या आधारे मांडण्यास मदत करतील. मुद्दयांच्या आधारे प्रसंग कसा लिहावा, याविषयीचे मार्गदर्शन करतील.

विद्यार्थ्यांना प्रसंगलेखन हे कौशल्य अधिक समजण्यासाठी -

सर्वात महत्वाचे -१. विषय,प्रसंग,व्यक्ती यानुसार संवेदनशील लेखन.

२. गंभीर,आनंददायी,उत्साही यानुसार प्रसंग लेखन.

३.घटनांचा तार्किक विचार व सुसंगत मांडणी


४.व्यक्तिपरत्वे भाषा बदलणे.

प्रसंगलेखनाच्या अनुषंगाने येणाऱ्या सर्व घटकांची माहिती सांगणे.

चला सराव करूया

जसे पुढील कृती पहा-

तुम्ही वर्तमानपत्र,वृत्तवाहिनी किंवा प्रत्यक्ष पाहिलेल्या एखाद्या अपघाताविषयी खालील मुद्यांच्या आधारे लेखन करण्याचा प्रयत्न करावा.



कल्पक होऊया

समाजातील एक सुजाण नागरिक म्हणून अपघाती मृत्यूची कारणे व ते टाळण्यासाठी तुम्ही काय उपाययोजना कराल?

दिवस -
एकोणचाळीस

क्षेत्र :वाचन,लेखन
कौशल्य/क्षमता :वाचन,लेखन .
संकल्पना : कल्पनात्मक निबंधलेखन.

अध्ययन निष्पत्ती : विविध लेखन प्रकारातील विचार,आशय समजून घेतात,आशयाशी संबंधित स्वतःचे अनुभव स्वतःच्या भाषाशैलीत लिहितात.लेखनाचे विविध प्रकार व शैली यांचा उपयोग करून कल्पनात्मक लेखन करतात.

जाणून घेऊया

शिक्षकांनी पुढील कृतीच्या मदतीने विद्यार्थ्यांशी चर्चा करावी. विद्यार्थ्यांना स्वमत प्रकटीकरणाची संधी द्यावी किंवा मते जाणून घ्या.

माणूस अमर झाला तर... तर काय होईल?

जसे की-१.प्रचंड लोकसंख्या वाढेल.

२.बेकारीचा प्रश्न.

शिक्षकांनी वरील विषयावर चर्चा करून विद्यार्थ्यांनी कल्पना कशी करावी,मुद्यांना अनुसरून सलग लेखन कसे करावे याविषयी मार्गदर्शन करणे.


सक्षम बनुया

कल्पनात्मक निबंध म्हणजे-

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मनात येणारे विचार,तर्क,भावना,कल्पना आणि मुख्य म्हणजे त्याबाबत केलेले वाचन,चर्चा,निरीक्षण त्यासंदर्भात घेतलेले अनुभव,केलेला विचार याची शब्दात सुसूत्र केलेली गुंफण कशी करावी तसेच स्वतःच्या अनुभवाच्या आधारे लेखन कसे करावे याविषयी मार्गदर्शन करावे. जे कधी घडूच शकत नाही ते घडले तर काय होईल अशी कल्पना करून केलेले लेखन म्हणजे कल्पनात्मक निबंध याविषयी चर्चा करणे.

चला सराव करूया

जसे की पुढील कृतीचे निरीक्षण करा मुद्यांच्या आधारे सलग लेखन करा.



कल्पक बनूया

पाऊस पडलाच नाही तर? काय लक्षात घ्याल? निबंधाच्या अनुषंगाने पाण्याविषयी काय विचार कराल ?





जसे १.पाणी कसे तयार होते ?

१. .....

२. .....

जसे १. पाण्याचा अपव्यय टाळा

१. .....

२. .....

दिवस –चाळीस

-एकेचाळीस

क्षेत्र :वाचन,लेखन

कौशल्य/क्षमता :वाचन,लेखन .

संकल्पना : पत्रलेखन.

अध्ययन निष्पत्ती : विविध लेखन प्रकारातील विचार,आशय समजून घेतात. दैनंदिन जीवनातील एखादी वैशिष्टयपूर्ण घटना ,स्थिती ,अनुभव यावर विविध प्रकारे सर्जनात्मक लेखन करतात.वाचन,लेखनाचा उद्देश लक्षात घेतात.

जाणून घेऊया

शिक्षकांनी पुढील पत्रलेखन कृतीच्या मदतीने विद्यार्थ्यांशी चर्चा करावी.पत्रलेखन कशा प्रकारे लिहिले जाते हे मुलांनी जाणून घ्यावे.मुलांना औपचारिक व अनौपचारिक पत्रलेखनातील फरक समजावून सांगणे.

आभारपत्र

- सुमितच्या शाळेत १४ नोव्हेंबर रोजी बालदिनाचे आयोजन करण्यात आले होते. सुमित पडवळ शाळेतील सांस्कृतिक विभागाचा विद्यार्थी प्रतिनिधी आहे. बालदिनाच्या कार्यक्रमप्रसंगी अध्यक्ष म्हणून उपस्थित असणाऱ्या डॉ. हेमंत साळवे (प्राचार्य) यांचे आभार मानण्यासाठी सुमितने त्यांना पत्र पाठवले आहे. ते अभ्यासा.

सुमित पडवळ
विद्यावर्धिनी विद्यालय
उस्मानाबाद,
पिन – ४१३५०१
दिनांक : १५.११.२०२०

प्रति,
डॉ. हेमंत साळवे
प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय,
उस्मानाबाद.
पिन – ४१३५०१

आदरणीय महोदय,
स. न. वि. वि.

१४ नोव्हेंबर रोजी बालदिनाच्या निमित्ताने आमच्या शाळेच्या कार्यक्रमासाठी आपण वेळात वेळ काढून उपस्थित राहिलात व आम्हां सर्व मुलांना मार्गदर्शन केले, याबद्दल सांस्कृतिक विभाग व शाळेच्या वतीने मी आपले आभार मानत आहे.

आपल्या अध्यक्षीय भाषणातून आपण पंडित जवाहरलाल नेहरू व विद्यार्थी यांच्याबद्दल अनेक कथा सांगितल्या. त्या कथा आम्हां सर्व विद्यार्थ्यांना खूप आवडल्या. तसेच विद्यार्थी कसा असावा, याबाबतही आपण मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनातून आम्हांला निश्चितच नवी दिशा मिळाली आहे.

खरे तर आपला रोजचा दिवस कामांमध्ये अत्यंत व्यस्त असतो, त्यातूनही वेळ काढून आपण कार्यक्रमास उपस्थित राहिलात, याबद्दल आपले पुनश्च मनापासून आभार.

आपला नम्र,
सुमित पडवळ
(सांस्कृतिक विभाग विद्यार्थी प्रतिनिधी)


शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील पत्राचे समजपूर्वक वाचन करण्यास सांगावे .

सक्षम होऊया

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील पत्रलेखनाप्रमाणे औपचारिक व अनौपचारिक पत्रलेखनातील फरक समजावून सांगणे.

आत्ताचे संवाद साधण्याचे प्रकार जसे massege,email इ.विषयावर चर्चा करावी.

जसे की औपचारिक पत्रे व अनौपचारिक पत्रे कोणाला लिहिली जातात हे सांगावे.



विद्यार्थ्यांना त्यात आलेल्या शंका,मत,विचार व्यक्त करण्याची संधी दयावी.कोणते पत्र औपचारिक आणि कोणते अनौपचारिक याविषयी द्विधा मनःस्थिती असू शकते म्हणून शंका समाधान करावे.

चला सराव करूया

कोरोना महामारीमुळे तुमची शाळा बंद आहेत. त्यामुळे तुम्ही शाळेत जाऊ शकत नाही यासाठी आरोग्य अधिकाऱ्याला लसीकरण लवकरात लवकर पूर्ण करण्याची विनंती करणारे पत्र लिहा.

शिक्षकांनी वरील कृती विद्यार्थ्यांना समजावून सांगताना पत्र कोणी? कोणाला? व कशासाठी? लिहायचे आहे हे समजावून सांगावे.

कल्पक बनूया

(चला लिहिते होऊया)

कोरोना महामारीच्या या आपत्तीमध्ये तुम्ही तुमच्या आयुष्यातील कोणकोणत्या गोष्टी गमावल्या त्यांची यादी करा? त्या सुधारण्यासाठी काय प्रयत्न कराल.

दिवस - बेचाळीस

क्षेत्र :वाचन,लेखन कौशल्य विकास


कौशल्य/क्षमता :वाचन,लेखन .

संकल्पना : भेटकार्ड तयार करणे.

अध्ययन निष्पत्ती : दैनंदिन जीवनातील एखादी वैशिष्टयपूर्ण घटना ,स्थिती ,अनुभव यांवर विविध प्रकारे सर्जनात्मक लेखन करतात.वाचन,लेखनाचा उद्देश लक्षात घेतात.

जाणून घेऊया

.



शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील शुभेच्छा संदेश वाचण्यास सांगून त्याविषयी चर्चा करणे.

स्वतःचे विचार सांगण्यास सांगावे .

सक्षम बनूया

शिक्षकांनी विविध विषयावर वरील शुभेच्छा संदेशाप्रमाणे उदा. सण, उत्सव, वाढदिवस, यशप्राप्ती, स्वागत अशा प्रसंगावर आधारित चर्चा करून, त्यांच्या मनातील विचार ,कल्पना व्यक्त करण्याची संधी दयावी.

चला सराव करूया

विद्यार्थ्याकडून विविध प्रसंगाच्या निमित्ताने भेटकार्ड तयार करून घ्यावीत. प्रसंगानुसार शुभेच्छा संदेश करून घ्यावेत.

तुमच्या आई वडिलांच्या लग्नाचा २५ वा वाढदिवस जवळ आला आहे. त्यानिमित्ताने आई वडिलांना शुभेच्छा संदेश देणारे भेटकार्ड तयार करा.

कल्पक होऊया

भेटकार्ड तयार करताना तुम्ही कोण-कोणत्या वस्तूंचा वापर कराल? आधुनिक तंत्रज्ञानाच्या(ॲप्स ,सॉफ्टवेअर ॲप्लीकेशन) च्या सहाय्याने जर भेटकार्ड, शुभेच्छा संदेश तयार करायचा असेल तर कसा तयार कराल?या विषयी आवश्यक माहिती मिळवा व लिहा.

दिवस -
त्रेचाळीस

क्षेत्र :वाचन,लेखन कौशल्य विकास

कौशल्य/क्षमता :वाचन,लेखन .

संकल्पना : सारांशलेखन.

अध्ययन निष्पत्ती : मराठी भाषेतील वेगवेगळ्या प्रकारचे साहित्य समजपूर्वक वाचतात व त्याबाबत आपले विचार लिखित स्वरूपात व्यक्त करतात.

जाणून घेऊया

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील उतारा समजपूर्वक वाचण्यास सांगून त्याविषयी चर्चा करावी. उताऱ्याचा विषय ,मध्यवर्ती कल्पना समजून सांगणे.वाचन करताना महत्त्वाच्या मुद्यांना अधोरेखित करावे.

अधोरेखित मुद्दे थोडक्यात कसे लिहावे याविषयी माहिती सांगणे.

नियमांचे पालन केले तर जशी एक शिस्त येते, तसेच व्यवस्थितपणा हा देखील एक महत्त्वाचा गुण आहे. तो गुण लहानपणापासूनच अंगी बाळगायला शिका. हा गुण आत्मसात केला तर तुमचे व्यक्तिमत्व प्रभावी ठरेल. रोजच्या व्यवहारात तर व्यवस्थितपणा अतिशय उपयोगी पडतो. ऑफिस मध्ये जशी व्यवस्थितपणा ची गरज असते, तशी वैयक्तिक जीवनातही असते. कामात गोंधळ झाला की डोक्यात व्हायला वेळ लागत नाही. आत्ताच्या तुमच्या शालेय जीवनात तुम्हीच करण्याजोगी काही कामे असतात. उदा.वह्यापुस्तके जागच्याजागी ठेवणे, दप्तर वेळेवर भरणे, डबा धुवायला टाकणे इ. कामात जर तुम्ही व्यवस्थित पण आणला तर कधीच तुमचा गोंधळ होणार नाही. या कामात आई-बाबांवर विसंबून राहू नका. एकदा परावलंबनाची सवय लागली की परत कधीच तुम्ही स्वावलंबी बनणार नाही. कामाचा उरक, नीटनेटकेपणा, व्यवस्थितपणा हे शिस्तीची अंगे आहेत.हे कौशल्य जर तुम्ही आत्मसात केले तर ते आयुष्यभर फलदायी ठरेल.

वरील उताऱ्याचे सारांशलेखन-

नियमबद्ध वर्तन व व्यवस्थितपणा हे यशप्राप्तीचे सुनिश्चित मार्ग आहेत. व्यवस्थितपणा प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा एक अविभाज्य घटक आहे.

व्यवस्थितपणाची सवय जडण-घडणीच्या वयातच लावून घेतल्याने वैचारिक गोंधळ कमी होऊन कामामध्ये नीटनेटकेपणा येईल आणि स्वावलंबनाकडे वाटचाल होईल. कामाचा उरक, नीटनेटकेपणा आणि व्यवस्थितपणा ही शिस्तीचे प्रमुख अंगे आहेत.



सारांशलेखन ही कृती सोडवताना-

१.उताऱ्याचे समजपूर्वक वाचन.

२.आशयाचे आकलन.

३.मध्यवर्ती विचार जाणून घेणे.

४.समजलेला विचार स्वतःच्या शब्दात मांडणे.

५.मूळ विषय,विचार,आशयाचा पूर्ण अर्थ सारांशाने प्रतिबिंबित व्हावा.याविषयी चर्चा करणे.

चला सराव करूया

विद्यार्थ्यांना पुढील उताऱ्याचे समजपूर्वक वाचन करण्यास सांगून त्या उताऱ्याचे [illegible]लेखन करण्यास सांगणे .

देशातील सर्वात मोठ्या वेड्यांच्या दवाखान्याला भेट दिली.तेव्हा एका खोलीकडे हात करून डॉक्टर म्हणाले ,"साहेब,येथे या खोलीत विमान चालविण्याचे,ते वेगाने पळविण्याचे स्वप्न पाहणारे वेडे आहेत.देशमुखांनी आशेने खिडकीतून आत पाहिले तर त्यांना तेथे कोणीही दिसेना.तसे त्यांनी डॉक्टरांना विचारले.तेव्हा डॉक्टर म्हणाले"साहेब,ते सर्व वेडे खोलीतच आहेत.कदाचित पलंगाखाली झोपून,आपण विमानाच्या खालीच झोपलो आहोत ,अशी कल्पना करून विमान दुरुस्त करत असतील.आपण सामान्य माणसेही असेच कल्पनांचे,मनोरथांचे विमान पळविण्याच्या आहारी गेलो आहोत.परंतु त्या खोलीत जसे वेडे दिसत नव्हते,तसाच स्वतःचा वेडेपणाही आपल्याला दिसत नाही.

कल्पक होऊया

वरील उताऱ्याच्या अनुषंगाने एका वाक्यात उत्तर येईल असे कोणतेही पाच प्रश्न तयार करा.

दिवस –
चव्वेचाळीस

क्षेत्र :वाचन,लेखन

कौशल्य/क्षमता :वाचन,लेखन .

संकल्पना : बोलीभाषा परिचय.

अध्ययन निष्पत्ती :परिसरातील बोलीभाषेविषयी चर्चा करतात व त्यांचा आस्वाद घेतात.

जाणून घेऊया

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील बोलीभाषेतील ओळींचे वाचन करून दाखवणे .

त्याविषयी चर्चा करणे.बोलीभाषेतील नविन शब्दांचा अर्थ सांगणे.

अहिराणी बोली

गावात तात्या वाचून पान हालनं नही .मानोस काही सिकेल व्हता असे नाहीपण कोनी. कायटाप त्याले आंग्ठेबहादूर म्हनानी ?चांग्ला जुनी फायनल व्हयेल व्हई आसे वाटानं तिन्ही भाऊ, तात्या ह्या चार भाऊ. वावरात काम करानां.

कुपारी बोली (कोकणी)

गावात झुजुकाका घारा पेपर यासॉं. तॉंपान दोपारसॉंबारा वाजता. झुजूने उगडलॉं आन पेपराशी काळ्या अक्षरात लीविलेली हेडलाईन जोराय वाशीली. वसईच्या पश्चिम किनारपट्टीवर स्कायलॅब पडणार.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अहिराणी, कुपारी बोली भाषा बोलल्या जाणाऱ्या प्रदेशाविषयी माहिती सांगणे. प्रमाणभाषेतील अर्थ सांगणे. भाषेचे वेगळेपण समजून सांगणे.

चला सराव करूया

विद्यार्थी बोलीभाषेतील शब्दांचे अर्थ प्रमाणभाषेत सांगतात का? हे पाहणे.

उदा.

१.सिकेल -

२.व्हता-

३.टाप-

४.फायनल-

१.घारा-

२.दोपारसॉ-

३.लीविलेली-

४.वाशीली-

कल्पक होऊया

तुम्ही बोलत असलेल्या किंवा तुमच्या परिसरात बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषेविषयी माहिती मिळवा व लिहा.

दिवस – पंचेचाळीस

चाचणी क्रमांक - 3

विद्यार्थ्याचे नाव - .....

प्रश्न. १ पर्यावरण संरक्षण करण्याविषयी जनजागृती करण्यासाठी दोन घोषवाक्ये तयार कर. (गुण-२)

१).....

२).....

प्रश्न.२ तुला दूरदर्शनवरील आवडलेल्या जाहिरातीविषयी पुढील मुद्यांच्या सहाय्याने माहिती लिही. (गुण-२)

१) जाहिरातिचा विषय कोणता आहे?.....

२)ती जाहिरात तुला आवडण्याचे कारण .....

प्रश्न.३ नदी व झाड एकमेकांशी बोलत आहेत अशी कल्पना करून त्यांच्यातील संवाद थोडक्यात लिही. (गुण-३)

.....

.....

.....

.....

प्रश्न.४ पाणी बचतीसाठी करावयाचे दोन प्रयत्न लिही. (गुण-२)

१) .....

२).....

प्रश्न.५ खालील शब्दांमधून गटात न बसणारा शब्द वेगळा काढून लिही. (गुण-२)

१)(इ-मेल, मेसेज, डाकघर,पत्र,).....

२) (पोस्टमन, पत्ता, मायना, दिनांक,आशय) .....

प्रश्न.६ कोरोना काळात तुला किंवा तुझ्या कुटुंबियांना कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागले? (गुण-२)

१) .....

२).....

प्रश्न.७ तुम्ही बोलत असलेल्या किंवा तुमच्या परिसरात बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषेतील दोन शब्द लिही. (गुण-२)

१).....

२).....